


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २८९ ■ मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## बुधवार, गुरुवार वादळीवाऱ्यासह पाऊस

**अकोला**: सोमवारी अकोल्यापेक्षा अमरावती जास्त हॉट ठरले. अकोल्याचे तापमान हे ४६.३ अंश सेल्सिअस इतके असताना अमरावतीचे तापमान त्या पेक्षा अधिक म्हणजेच ४६.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. अकोल्याचे तापमान सरासरी साडेतीन अंशांने जास्त होते तर अमरावतीचे सरासरीपेक्षा साडेचार अंशांनी अधिक होते. मंगळवारी पुन्हा एकदा उष्णतेच्या लाटेचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. पण, बुधवार आणि गुरुवार नव्या संकटाची चाहूल लागली आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार बुधवारी वादळी वाऱ्यासह पावसाचा व मेघगर्जनेचा अंदाज असून तर गुरुवारी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यानंतर पुढील काही दिवस ढगाळ वातावरण राहील असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

# छत्रपती शिवरायांविषयी निरर्थक वाद सुरू- मुख्यमंत्री

प्रतिनिधी २८ एप्रिल

**सोलापूर:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी छत्रपती शिवाजी महाराजांवर सध्या निरर्थक वाद सुरू असल्याचा असल्याचा दावा केला. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी सध्या निरर्थक वाद सुरू आहे. या देशात छत्रपती शिवरायांचा अवमान कुणीच करू शकत नाही. शिवाजी कोण होता? हे पुस्तक १९७९ साली लिहिण्यात आले. त्यावर आज वाद उकरून काढायचा आणि दोन्ही बाजूंनी एकमेकांना भिडायचे हे शुद्ध असामाजिक व असंवदेनशील कृत्य आहे, असे ते म्हणालेत.



कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता? या पुस्तकावरून सध्या मोठा वाद सुरू आहे. बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकातील शिवाजी महाराजांच्या एकेरी उल्लेखावरून प्रकाशक प्रशांत आंबी यांना धमकी देत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली होती. त्यानंतर आज आंबी यांनी बुलढाण्यात शिवाजी कोण होता पुस्तकाचे वाचन करत संजय गायकवाड यांच्या घरावर डाव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांसोबत मोर्चा काढला.

पोलिसांनी त्यांना स्थानबद्ध केले आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर दौऱ्यावर असणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपरोक्त शब्दांत या घटनेविषयी आपला रोष व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री सोलापुरात पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, सध्या छत्रपती शिवाजी महाराजांविषयी निरर्थक वाद निर्माण झाला आहे. या देशात छत्रपती शिवरायांचा कुणीही अवमान करू शकत नाही. त्यांचा मान एवढा मोठा आहे की, कुणीही त्यांचा अशा पद्धतीने अपमान करणे शक्य नाही. आता हे पुस्तक (शिवाजी कोण होता) १९७९ साली लिहिण्यात आले.

त्यावर आज वाद उकरून काढायचा आणि दोन्ही बाजूंनी एकमेकांना भिडायचे हे शुद्ध असामाजिक व असंवेदनशील कृत्य आहे.आक्षेप घेणाऱ्याने (संजय गायकवाड) हे पुस्तक वाचले की नाही हे मला माहिती नाही. तसे आंदोलन करणाऱ्या लोकांनाही आपण आंदोलन कशासाठी करत आहोत हे माहिती आहे की नाही हे मला माहिती नाही. केवळ कोणतातरी एखादा मुद्दा पकडायचा आणि त्यावर वाद उभा करायचा व चर्चेत रहायाचे हा प्रकार योग्य नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले.

> कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना शिवीगाळ करून धमकी दिल्याचे पडसाद सध्या संपूर्ण राज्यभरात उमटत आहेत.अशातच आता पोलिसांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना एका अज्ञातस्थळी स्थानबद्ध केल्याची माहिती समोर आली आहे. आज बुलढाणा शहरात निषेध मोर्चा काढण्यात येणार होता. या मोर्चात प्रकाशक प्रशांत आंबी देखील सहभागी होणार होते.यासाठी ते काल रात्री कोल्हापूरहून बुलढाण्यात येत असताना बुलढाणा जिल्ह्याच्या हद्दीतच त्यांना बुलढाणा पोलिसांनी चिखली येथे स्थानबद्ध केल्याची माहिती समोर आली आहे. याबाबतची पुष्टी स्वतः पोलिसांनी केली आहे. त्यामुळे आता आंबी हे नियोजित आंदोलन स्थळी पोहचण्याची शक्यता कमी असल्याचं बोललं जात आहे.

## बारावीचा निकाल पुढील आठवड्यात
# दहावीचा निकाल १५ मे पूर्वी

प्रतिनिधी २८ एप्रिल

**पुणे:** इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल पुढील आठवड्यात ५ किंवा ७ मे रोजी लागण्याची शक्यता आहे. त्यानंतर आठवड्याभरात म्हणजे १५ मेपूर्वी दहावीचा निकालही घोषित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थी व पालकांची प्रतीक्षा संपणार आहे.

बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी सुरुवातीला बारावीचा निकाल एप्रिल महिन्याच्या शेवटची लागण्याची शक्यता व्यक्त केली होती. पण मध्येच कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उगारल्याने हा निकाल आठवडाभर लांबण्याची शक्यता आहे. आता हा निकाल पुढील आठवड्यात ५ किंवा ७ मे रोजी लागण्याची शक्यता आहे.

बारावीचा निकाल लागल्यानंतर ४-५ दिवसांनी दहावीचा निकाल घोषित होण्याची शक्यता आहे. राज्यात १७ मे पासून अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. त्यामुळे हा निकाल तत्पूर्वी लागण्याची शक्यता आहे. अकरावी प्रवेशाची लांबत जाणारी प्रक्रिया टाळण्यासाठी तसेच पुढील प्रवेशपूर्व परीक्षांमुळे दहावी-बारावीच्या परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्येच पूर्ण करण्याचा निर्णय झाला.

# ग्राहकांना वेळेवर सिलेंडर न देणे गॅस एजन्सीला भोवले

## समर्थ गॅस आता बंद, ग्राहक दुसऱ्या एजन्सीला जोडले
## जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आली कारवाई

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अकोला:** अकोला शहरातील जुने शहर भागात असलेल्या समर्थ गॅस एजन्सीवर कारवाई झाल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. गॅस सिलेंडर संदर्भात ग्राहकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाल्यामुळे सदर गॅस एजन्सीवर गॅस एजन्सीवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पुरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

अकोला शहरातील जुने शहर भागात असलेल्या एचपी कंपनीचे समर्थ गॅस एजन्सी बाबत ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात तक्रारी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पुरवठा विभाग यांच्याकडे केल्या होत्या. लाभार्थी गॅस धारक ग्राहक यांना वेळेवर सिलेंडर न देणे तसेच सतत दुकान बंद ठेवणे या व इतर तक्रारी च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने



गॅस एजन्सी च्या विक्री अधिकारी यांच्या कडे कारवाई चा प्रस्ताव दाखल करताच सदर एजन्सी बंद करण्यात आली आहे. या एजन्सी मधील दोन ते अडीच हजार गॅस कार्ड धारक ग्राहक अकोला शहरातील चार एजन्सी मध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे. अकोला शहरातील यदुराज गॅस एजन्सी, पटेल गॅस एजन्सी, विजय गॅस एजन्सी तसेच अकोला गॅस एजन्सी या ठिकाणी सदरच्या ग्राहकांना यानंतर गॅस सिलेंडर मिळणार आहे. या संदर्भातील ग्राहकांची यादी ही गॅस एजन्सी, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय तसेच अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय मध्ये लावण्यात आली असून शहरातील इतर गॅस एजन्सीबाबत ग्राहकांना त्रास होत असल्यास त्यांनी तात्काळ जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे. अकोला जिल्ह्यामध्ये प्रथमच गॅस एजन्सीवर करण्यात आलेल्या कारवाईमुळे एकच धावपळ उडाली आहे.

# वॉचमनच्या मुलाचा संशयास्पद मृत्यू

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अकोला:** अकोल्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना समोर आली आहे. डाबकी रोड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नॅशनल हायवेवर असलेल्या अशोक लेलँड शोरूममध्ये सुरक्षारक्षक म्हणून काम करणाऱ्या तरुणाचा जळालेल्या अवस्थेत मृत्यू झाला आहे.

अकोल्याच्या डाबकी रोड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या नॅशनल हायवेवर अशोक लेलँडचे शोरूम आहे. याच शोरूममध्ये बबन शेळके आणि त्यांचा मुलगा चेतन शेळके हे दोघेही वॉचमन म्हणून काम करत होते. रविवारी, २६ एप्रिलच्या रात्री या दोघांचीही नाईट ड्युटी होती. रात्रीच्या वेळी वडील बबन शेळके यांनी चेतनला 'तू घरी जा' असे सांगितले. वडिलांच्या सांगण्यावरून चेतन घरी जाण्यासाठी निघाला, पण काही वेळातच काळाने घाला घातला.चेतन घरी गेला नसल्याचे लक्षात येताच वडिलांनी त्याला फोन केला, मात्र त्याने फोन उचलला नाही. शोध घेतला असता, शोरूमच्या बाजूलाच असलेल्या शेतात चेतन गंभीररीत्या जळाल्या अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला.

त्याला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान पहाटे ४ वाजेच्या सुमारास त्याची प्राणज्योत मालवली.या प्रकरणी मृताचे वडील बबन शेळके यांनी अत्यंत खळबळजनक आरोप केले आहेत. 'कोणीतरी फोन करून माझ्या मुलाला बोलावून घेतले आणि त्याला जिवंत जाळले,' असा दावा त्यांनी केला आहे. कुटुंबियांनी आपला संशय शोरूमच्या मॅनेजरवर व्यक्त केला असून, या हत्येमागे मोठे षडयंत्र असल्याचा आरोप केला

# ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार पती-पत्नी ठार

## खामगाव - अकोला दरम्यानची घटना

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अकोला :** लग्न समारंभ आटोपून दुचाकीने घरी परतत असताना भरधाव ट्रकने मागून धडक दिल्याने शहरातील खडकी परिसरातील पती पत्नीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सोमवार, २७ एप्रिल रोजी रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास घडली. हा अपघात राष्ट्रीय महामार्गावर खामगाव अकोला दरम्यान पिंप्री गवळी फाट्याजवळ झाला.

प्राप्त माहिती नुसार, अतुल सिरसाठ (३२) व दीक्षा अतुल सिरसाठ (२८) रा. खडकी, अकोला अशी मृतांची नावे आहेत. हे दोघे पती-पत्नी दुचाकी क्रमांक एम. एच. ३० बीवाय ०९३२ ने मोताळा तालुक्यातील तळणी येथे नातेवाइकांच्या लग्न समारंभासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपल्यानंतर ते



अकोल्याकडे परतत होते. दरम्यान, पिंप्री गवळी फाट्याजवळ त्यांच्या पुढील ट्रकने अचानक वेग कमी केला. त्यामुळे अतुल सिरसाठ यांनीही दुचाकीचा वेग कमी केला. मात्र, मागून येणाऱ्या दुसऱ्या भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की, दोघांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. त्यानंतर दोघांचे मृतदेह खामगाव येथील सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. तपास सुरू आहे.

# अकोला MIDC तील परप्रांतीय कामगारांचे पोलीस व्हेरिफिकेशनच नाही ?

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अकोला :** अकोला एमआयडीसी मध्ये पोटाची खळगी भरण्यासाठी शेकडो परप्रांतीय कामगार अनेक कारखान्यांमध्ये कार्यरत आहेत. या कामगारांमध्ये विशेषतः मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, छत्तीसगडचे शेकडो कामगार कार्यरत आहेत. त्यात अनेक बालमजुरांचा सुद्धा समावेश आहे. पर प्रांतातील शेकडो कामगारांना कामावर लावायचे, नियमांना तिलांजली देऊन त्यांच्याकडून तासनतास काम करून घ्यायचे.

हे करतानाच ना त्यांच्या कामाची नोंद, न कुणाचे कागदपत्र मागायचे एवढेच काय तर अनेकांचे पोलीस व्हेरिफिकेशन ही केले जात नसल्याची धक्कादायक माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. अनेक परप्रांतीय कामगारांची कागदपत्रे व नोंद तसेच पोलीस व्हेरिफिकेशन नसल्याने या कामगारांचा काही क्राईम रेकॉर्ड आहे का? तो त्याच्या राज्यातून मोठा गुन्हा करून पळून आलेला आहे का? अशी कुठलीही शहानिशा एमआयडीसीच्या उद्योगात होत




### परप्रांतीय कामगारांमुळे स्थानीय कामगारांवर अन्याय

एमआयडीसीत मोठ्या प्रमाणात परप्रांतीय कामगार कार्यरत आहेत. आपल्या परिवारासह हे कामगार फॅक्टरीच्या आवारातच राहत असल्याने तसेच स्थानीय कामगाराच्या तुलनेत स्वस्तात काम करण्यास तयार असल्याने कारखानदार या परप्रांतीय कामगारांना कामावर ठेवण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे स्थानिक कामगारांना रोजगार मिळत नसल्याची स्थिती दिसून येत आहे. एक तर आधीच अकोला जिल्ह्यात रोजगाराची साधने कमी असल्याने व एमआयडीसीत परप्रांतीय कामगारांची संख्या वाढल्याने स्थानिक कामगारांमध्ये अन्याय होत असल्याची भावना दिसून येत आहे

नसल्याचे दिसून येत आहे दुर्दैवाने अपघात झाल्यास आणि कंपनीतील कामगाराच्या जीवाचे बरे वाईट झाल्यास अनेकदा परस्पर प्रकरण दाबले जात असल्याची ही शंका निर्माण होत आहे. एमआयडीसीतील अनेक फॅक्ट्ऱ्यांमध्ये मजुरांच्या राहण्याची व्यवस्था फारच दयनीय आहे. घाण कचऱ्यात कोंदट ठिकाणी मजुरांना राहावे लागते. हे पाहता संबंधित विभागाने एमआयडीसीतील उद्योगांची पाहणी करून येथे कार्यरत परप्रांतीय कामगारांची चौकशी करून त्यांची कागदपत्रे व पोलीस व्हेरिफिकेशन करावे अशी मागणी होत आहे.



सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## श्री सद्गुरू भैय्युजी महाराज जन्मोत्सव उद्या



**अकोला :** शहरातील छोटी उमरी परिसरातील पाटील मार्केट येथील अभिरुची गार्डनमधील 'शिवालय' येथे श्री सद्गुरू भैय्युजी महाराज यांचा जन्मोत्सव उद्या (बुधवार) मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने गुरु भक्तांकडून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून

### शाम शर्मा यांचे संगीतमय सामुहिक सुंदरकांड

परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.०० वाजता गुरु पाद्यपूजा व आरतीने होणार आहे. त्यानंतर सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत गुरुबंधू श्री श्यामजी शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली संगीतमय सुंदरकांड पाठ आयोजित करण्यात आला आहे. तसेच दुपारी १२.२५ ते २.०० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांना उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांच्यां वतिने अतुल पाटील, पं. शेखर शर्मा केले आहे.

## ग्राहकांना विद्युत देयके मिळत नसल्याची ओरड

### महावितरण अधिकारी लक्ष घालतील का

**अकोला:** शहरातील बहुतांश भागात विद्युत ग्राहकांना विद्युत देयक मिळत नाही. देयकांचे वाटप होत नसल्यामुळे संबंधित ग्राहका मध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. काहीवेळा ४, ५ महिन्यांचे विद्युत देयक एकाच वेळी पाठवण्यात येत असल्यामुळे एवढी मोठी रक्कम कशी जमवावी असा प्रश्न पडतो. याकडे महावितरण अधिकारी लक्ष देतील का असा प्रश्न उपस्थित होत आहे. पाच हजार रुपये मध्यमवर्गीय लगेच भरू शकत नाही. ग्राहकांना वेळेत देयके मिळाली तर ती भरणे शक्य होते. या बाबतीत सुसूत्रता असावी असे सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र बाहेती यांनी म्हटले आहे. वरिष्ठांना त्यांनी पत्र पाठवले आहे.

## ब्रिलियंट कॅरम अकादमी चा पुरस्कार वितरण सोहळा

**अकोला:** राष्ट्रीय खेळ प्रशिक्षणात सक्रिय असणाऱ्या ब्रिलियंट कॅरम अकादमी व प्रो कोड अकादमीच्या वतीने आयोजित कॅरम स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला.यात १० व १८ वर्षा आतील मुला मुलीच्या कॅरम स्पर्धेचे आयोजन गोरक्षण रोड येथील ब्रिलियंट कॅरम अकादमी येथे करण्यात आले होते.या स्पर्धेचा प्रारंभ प्रो कोड अकादमीच्या संस्थापिका वर्षा पटेल, जितेन्द्र अग्रवाल याच्या हस्ते करण्यात आले.

# मळसुरमध्ये मुख्य वीजवाहिनीमुळे आग

प्रतिनिधी २८ एप्रिल

**पातूर :** पातूर तालुक्यातील मौजे मळसुर येथे रविवारी (दि. २६ एप्रिल २०२६) दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास मुख्य विद्युत वाहिनीवर फॉल्ट झाल्याने भीषण आग लागून महिला शेतकरी सौ. पूनम विनोद राऊत यांच्यासह इतर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या आगीत लिंबू, आंबा, पेरू आदी फळझाडांसह ठिबक सिंचन व्यवस्था, स्प्रिंकलर पाईप आणि सोलर साहित्य जळून खाक झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, अचानक मुख्य लाईनवर शॉर्टसर्किट होऊन आगीचे गोळे जमिनीवर पडले. त्या वेळी शेतात गहू पिकाचे काड असल्यामुळे आगीने क्षणार्धात रौद्र रूप धारण केले.

### महिला शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान



वाऱ्यामुळे आग चारही बाजूंनी पसरली आणि विझवण्याचे प्रयत्न निष्फळ ठरले.

या आगीत सर्वे नंबर ७१ मधील सौ. पूनम राऊत यांच्या शेतातील लिंबू, आंबा, पेरू झाडे तसेच सुमारे ५ एकर क्षेत्रातील झाडाखाली साठवून ठेवलेले ठिबक व स्प्रिंकलर साहित्य पूर्णपणे जळून गेले. तसेच तेजस सुभाष राऊत यांच्या शेतातील सोलर पॅनल, केबल, पाईप आणि फळझाडांचेही मोठे नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच शेतकरी विनोद राऊत यांनी चानी पोलीस स्टेशन तसेच महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना कळवून तक्रार दाखल केली आहे. संबंधित यंत्रणेकडून पंचनामा करून तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात येत आहे.

प्रतिक्रिया : 'दुपारी १२ ते १ वाजण्याच्या दरम्यान शॉर्टसर्किटमुळे आग लागून ठिबक, स्प्रिंकलर संच, लिंबू, आंबा, पेरू झाडे जळून खाक झाली. यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले असून मला तात्काळ भरपाई मिळावी,' अशी मागणी सौ. पूनम विनोद राऊत यांनी केली.

तर 'वीज तार तुटून स्पार्किंग झाल्यामुळे माझे सोलर पॅनल, केबल, पाईप व आंबा-रामफळ झाडे जळाली. प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी,' अशी मागणी शेतकरी तेजस सुभाष राऊत यांनी व्यक्त केली.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वीज विभागाने अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## पातूर येथे 'गोमाता सन्मान आवाहन अभियान' अंतर्गत रॅली उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २८ एप्रिल

**पातूर :** गोमाता सन्मान आवाहन अभियान अंतर्गत पातूर येथे आज भव्य व यशस्वी रॅलीचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतभर राबविण्यात येत असलेल्या या अभियानाचा एक भाग म्हणून पातूर तहसील कार्यालयावर मोठ्या संख्येने गोभक्तांनी एकत्र येत निवेदन सादर केले.

गोवंश रक्षण, संवर्धन तसेच गोहत्येला प्रतिबंध घालण्यासाठी कठोर कायदे करण्यात यावेत, या मागणीसाठी समाजातील विविध घटक एकवटले होते. रॅलीमध्ये महिला, युवक, सामाजिक



कार्यकर्ते, गोशाळा संचालक तसेच सकल हिंदू समाजातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. महिलांनीही मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवत आपली गोमातेप्रती भावना व्यक्त केली. संत-महंतांनी कीर्तन व प्रवचनांच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन केले. रॅलीदरम्यान 'गोमाता की जय' अशा घोषणांनी परिसर दुमदुमला. समाजात गोसंवर्धनाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

यावेळी उपस्थितांनी मत व्यक्त करताना सांगितले की, गोमाता ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी तिचे संरक्षण अत्यंत आवश्यक आहे. तसेच गोमातेला 'राष्ट्रमाता' दर्जा देण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली.

जोपर्यंत सरकारकडून गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा दिला जात नाही आणि गोहत्येविरोधात कठोर कायदे होत नाहीत, तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील, असा निर्धार यावेळी सर्वानुमते व्यक्त करण्यात आला. रॅलीचे आयोजन यशस्वी करण्यासाठी पातूर येथील गोभक्त समाज, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. पुढील काळातही हे अभियान अधिक तीव्र करण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

## अकोट शहरात गोमातेच्या सन्मानार्थ पदयात्रा उत्साहात संपन्न

वि. प्रतिनिधी २८ एप्रिल

**अकोट:** अकोट शहरात आज गोमातेच्या सन्मानार्थ शहरातील गोप्रेमी, गोभक्त व गोरक्षक यांच्या वतीने भव्य पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत व्यापारी वर्ग, पत्रकार बांधव, महिलावर्ग, युवक-तरुण, तसेच विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि बहुसंख्य नागरिकांचा सहभाग उल्लेखनीय होता. संपूर्ण शहरात भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

ही पदयात्रा गो सन्मान अभियान अंतर्गत आयोजित करण्यात आली होती. या अभियानाचा मुख्य उद्देश



गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळवून देणे, गोमातेच्या होणाऱ्या हत्या तात्काळ बंद करणे, त्याविरोधात केंद्र शासनामार्फत कठोर कायदा तयार करणे तसेच गोमातेची सेवा, सुरक्षा व सन्मान यासाठी स्वतंत्र गोपालन केंद्रीय मंत्रालय स्थापन करणे हा आहे. पदयात्रेदरम्यान सहभागी नागरिकांनी गोमातेच्या संरक्षणासाठी जोरदार घोषणा देत जनजागृती केली. शहरातील विविध मार्गांवरून निघालेल्या या यात्रेचा समारोप तहसील कार्यालय, अकोट येथे करण्यात आला.

यावेळी तहसीलदार, अकोट यांना पंतप्रधान, राष्ट्रपती, राज्यपाल तसेच राज्याचे मुख्यमंत्री यांच्या नावे गोमातेच्या संरक्षण व सन्मानासंदर्भातील मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या भव्य पदयात्रेमुळे अकोट शहरातील सनातन धर्मप्रेमी नागरिकांची एकजूट आणि गोमातेप्रती असलेली श्रद्धा पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

## निधन वार्ता

### अरुण येणकर



**हिवरखेड:** येथील अरुण मोतीराम येणकर यांचे सोमवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

### सचिन रायबोले



**अकोट:** बोर्डी येथील शेतमजूर सचिन विश्वनाथ रायबोले ३४ यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील व तीन बहिणी आणि आप्तपरिवार आहे.

### नाझीम अली युनूस अली



**अकोट:** येथील लक्झरी गाड्या व्यवसायी नाझीम अली युनूस अली (३४) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

## महावितरणला सादर केलेल्या निवेदनानंतर अधिकाऱ्यांची तातडीची बैठक

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अकोला:** अकोला शहरात सतत होत असलेली वीज खंडित होणे, व्होल्टेजचे वारंवार कमी-जास्त होणे, डीपी व ट्रान्सफॉर्मरला आग लागण्याच्या घटना तसेच नागरिकांच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे होत असलेले नुकसान या गंभीर समस्यांबाबत राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष शरदचंद्र पवार महानगर, अकोला यांच्या वतीने महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखाली महावितरणचे श्री अजित दिनोरे, कार्यकारी अभियंता (प्रशासन), महावितरण अकोला यांना महत्त्वपूर्ण निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात शहरातील विविध भागांमध्ये दिवस-रात्र होत असलेल्या वीज खंडितमुळे नागरिकांना भेडसावत असलेल्या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले. तीव्र उन्हाळा आणि प्रचंड उष्णतेच्या पार्श्वभूमीवर लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि रुग्ण यांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत असल्याचे नमूद करण्यात आले.

तसेच शहरभरात व्होल्टेजचे अत्यधिक कमी-जास्त होण्यामुळे

### वीज समस्येवर लवकर कारवाईचे संकेत



फ्रिजचे कॉम्प्रेसर, टीव्ही, कुलर, पंखे, इन्व्हर्टर तसेच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे खराब होत असल्याच्या तक्रारीही प्रमुखतेने मांडण्यात आल्या. नुकसानग्रस्त नागरिकांना योग्य ती भरपाई देण्यात यावी, अशी मागणीही पक्षाच्या वतीने करण्यात आली.

निवेदनात असेही नमूद करण्यात आले की, मेंटेनन्सवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च होत असूनही डीपी आणि ट्रान्सफॉर्मरला आग लागण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत, ज्यामुळे नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण झाला आहे. पक्षाच्या वतीने वीजपुरवठा तात्काळ सुरळीत करणे, व्होल्टेज समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे तसेच सर्व डीपी आणि वीज लाईनची तातडीने तपासणी करण्याची मागणी करण्यात आली. विशेष बाब म्हणजे, निवेदन प्राप्त होताच महावितरण प्रशासनाने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली. या बैठकीत शहरातील वीज व्यवस्था, व्होल्टेज समस्या, ट्रान्सफॉर्मरची स्थिती तसेच त्वरित सुधारात्मक उपाययोजनांवर चर्चा झाल्याची माहिती मिळाली असून नागरिकांना लवकरच दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या प्रसंगी महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी, कार्याध्यक्ष देवाभाऊ ताले, प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया, समाजसेवक मोहम्मद फिरोज, जावेद ठेकेदार तसेच मोहम्मद शफीक उपस्थित होते.

समस्येचे तातडीने निराकरण न झाल्यास महावितरण कार्यालयावर तीव्र आंदोलन व मोर्चा काढण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.

## भरधाव कारच्या धडकेत मुलाचा मृत्यू; संतप्त ग्रामस्थांनी केला रास्ता रोको

प्रतिनिधी २८ एप्रिल

**कुटासा:** भरधाव कारच्या धडकेत १४ वर्षीय तेजसचा केळीवेळी फाट्यावर मृत्यू झाल्याची घटना सोमवारी घडली. या घटनेमुळे संतप्त ग्रामस्थांनी भरउन्हात तीन तास रास्ता रोको करून करून संबंधितांविषयी संताप व्यक्त केला. केळीवेळी येथील तेजस संदीप मांडले (१४) हा आपल्या आईसोबत दहीहंडाकडे जाण्यासाठी बसस्टँडवर आला होता. दहीहांडाकडून येणाऱ्या स्विफ्ट डिझायर एमएच २७ डीएल ७२४० च्या चालकाने भरधाव



वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवून तेजसला जबर धडक दिली. या धडकेत तेजस गंभीररीत्या जखमी झाला. त्याच कारमध्ये त्याला जखमी अवस्थेत ग्राम मंडळ अध्यक्ष किशोर बुले व नातेवाइकांनी अकोला येथील रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासणी करून तेजसला मृत घोषित केले. तेजसवर शोकाकुल वातावरणात सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेची फिर्याद प्रदीप मांडले यांनी दहीहांडा पोलीस स्टेशनला दिली. सदर कारचालक किशोर मनोहर भदे रा. लोतवाडा, तालुका दर्यापूर याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास दहीहांडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार गोपाल ढोले यांच्या मार्गदर्शनात पोलीस कर्मचारी करीत आहेत. दहीहंडा फाटा ते दहीहंडा या १५ किलोमीटर रस्त्याचे नुकतेच कॉंक्रिटीकरण करण्यात आले. या रस्त्यावर कोणत्याच ठिकाणी संबंधित ठेकेदाराने गतिरोधक टाकलेले नाही. केळीवेळी येथे बसस्टँडच्या बाजूला शाळा आहे. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला केळीवेळी ते गिरजापूर रस्ता आहे. त्यामुळे या रस्त्यावर वाहनांची वर्दळ सुरूच असते. या रस्त्यावरून वाहनधारक भरधाव वेगाने वाहन चालवीत असून, गतिरोधक नसल्यामुळे ही दुर्दैवी घटना घडली.

## भाचा कॉन्स्टेबल झाला गावात मिरवणूक निघाली

प्रतिनिधी २८ एप्रिल

**हिवरखेड:** या भागातील मुले मुली अभ्यास, मेहनत करून सैन्यदल, पोलिस विभागात नोकरी प्राप्त करीत आहेत. आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द त्यांनी बाळगलेली दिसते. सामाजिक कार्यकर्ते मोईज जमादार यांच्या किराणा दुकानात हातभार लावत

अभ्यास करून त्यांचा भाचा अबुतल्हा आदिल मोहब्बत



पोलिस दलात दाखल झाला. मामांनी मिरवणूक काढून आनंद साजरा केला. २०२२ व २०२३ मध्ये अबुतल्हा याला अपयश आले होते. परंतु हार न मानता तिसऱ्या परीक्षेत अबूतल्हा याची महाराष्ट्र पोलिस कॉन्स्टेबल मध्ये निवड झाली. त्याच्या निवडीचे गावात कौतुक करण्यात आले. तर त्याच्या द टार्गेट अकॅडमीच्या वतीने जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली, अबूतल्हा व त्याचे मामा मोईज जमादार त्याचे आईवडील यांचे सर्वांनी कौतुक केले. मिठाई वाटण्यात आली.

## सर्वोदय चळवळ अधिक गतिमान करण्याची गरज- रमेशअण्णा दाने

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अकोला:** राष्ट्रीय एकता अबाधित राखण्यासाठी महात्मा गांधी, विनोबा विचारांची सर्वोदय चळवळ वर्तमान परिस्थितीत अधिक गतिमान करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन रमेशअण्णा दाने यांनी केले.

जे आर डी टाटा इंग्लिश स्कूल येथे आयोजित महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाच्या लोक सेवक एकदिवशीय अधिवेशनात पुढील तीन वर्षासाठी अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर कार्यकर्त्यांना संबोधित होते. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी नेते प्रशांत गावंडे होते. महादेवराव भुईभार, एकनाथ डगवार, प्रा. प्रवीण भोयर, सर्व सेवा संघाचे मंत्री अविनाश काकडे, विश्वस्त मोहम्मद शेख हुसेन, बजरंगभाई




सोनवणे मुंबई, निरीक्षक प्रतिनिधी भूपेश भूषन, डॉ. शि.ना. ठाकुर, स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. विवेक हिवरे, सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड यांची प्रमुख उपस्थिती होती. नवयुवकांना या प्रवाहात आणण्याचे काम प्राधान्याने करणार असल्याचे नवनियुक्त महासचिव बजरंग भाई सोनवणे म्हणाले. तरूण कार्यकर्त्यांना घेऊन राष्ट्र निर्माण करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन सर्व सेवा संघाचे मंत्री अॅड. अविनाश काकडे यांनी केले. सर्व सेवा संघाचे कार्यकारी विश्वस्त मोहम्मद शेख हुसेन यांनी विचार मांडले. सलाईबन सारख्या आदिवासी भागात काम करणारे मंजीतसिंह शिख, मधुकर शिरसाठ धुळे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. आदिवासी महिलांसाठी झटणाऱ्या समाजसेविका माया धांडे यांचा लताताई राजपूत बुलढाणा यांनी सत्कार केला. भूषण शर्मा (युवा सेल संयोजक ), प्रा. नूतन माळवी, विनोद देवतळे यवतमाळ, कैलास मते गडचिरोली, अशोक तायडे लाखनवाडा जि. बुलढाणा, चरखा प्रशिक्षक आत्माराम शेळके, साहेबराव तायडे, रोहित तारकस, महेश आढे, अनिल मावळे, बजरंग सोनवणे, रवी भाई यवतमाळ, गुरु चरणसिंग ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला.

देशात शांतता, स्थैर्य वृद्धिंगत करण्यासाठी चळवळ जीवंत ठेवण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्रशांत गावंडे यांनी समारोपप्रसंगी केले. सुनील अवचार, किशोर मिश्रा, शक्तीचरणसिंह ठाकुर, अनुराग मिश्र, मंगेश चिलात्रे, डॉ. मनीष देशमुख, रत्नदीप थोरात, रवी नेमाडे, राजेंद्र सिंह ठाकुर, क्रांती आढे, शुभांगी ठाकुर, अनिल वाघमारे यांचा आयोजनात सहभाग होता.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226

मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.

- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

वैशिष्ट्ये :

- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा



पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# जनतेचा आवाज बनला 'सिटी न्यूज सुपरफास्ट'

**सां**ध्य दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट हे पश्चिम विदर्भातील पत्रकारितेच्या क्षेत्रात वेग, विश्वास आणि सामाजिक बांधिलकी यांचे प्रतीक बनले आहे. सुमारे १५ वर्षांपूर्वी अकोला येथून संस्थापक संपादक बंडूभाऊ उर्फ प्रदीप देशमुख यांनी या दैनिकाची सुरुवात केली. सुरुवातीपासूनच सामान्य माणसाच्या प्रश्नांना प्राधान्य देत, स्थानिक समस्यांना वाचा फोडण्याचा निर्धार या वृत्तपत्राने जपला आहे. अल्पावधीतच सिटी न्यूज सुपरफास्टने अकोला, वाशिम, बुलढाणा, अमरावती आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आपले जाळे विस्तारले. ग्रामीण आणि शहरी भागातील वाचकांपर्यंत पोहोचत, त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील घडामोडी प्रभावीपणे मांडण्याचे कार्य या दैनिकाने केले आहे. त्यामुळेच हे वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासास पात्र ठरले आहे. आरआरसी ग्रुपच्या माध्यमातून कार्यकारी संपादक पंकज देशमुख यांच्या कुशल नेतृत्वाखाली या दैनिकाची वाटचाल अधिक सक्षम आणि गतिमान झाली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वृत्तपत्राने आधुनिकतेची कास धरत, पत्रकारितेच्या मूल्यांनाही तितकेच जपले आहे. आज सिटी न्यूज सुपरफास्ट हे केवळ एक वृत्तपत्र नसून, सर्वसामान्य जनतेचा आवाज बनले आहे. समाजातील विविध प्रश्न, अन्याय आणि समस्या यांना उजाळा देत, सकारात्मक बदल घडवण्याचे कार्य हे दैनिक सातत्याने करत आहे. त्यामुळेच पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक म्हणून सिटी न्यूज सुपरफास्टने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.




**राहुल वासनिक,**
**ब्युरोचिफ, यवतमाळ**
**मो. ९८९०८७५२६१**





















































जाहिरात संकलन : पुनीत मजेठीया, आर्णी

# यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक मंडळ बरखास्त

## प्रशासकांची नियुक्ती : मुदत संपूनही मंडळ कायम; शासनाची कारवाई

प्रतिनिधी २८ एप्रिल

**यवतमाळ** : यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ अखेर शासनाने बरखास्त केले असून, जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी प्रशासक म्हणून सोमवारी तातडीने पदभार स्वीकारला. या निर्णयामुळे सहकार क्षेत्रासह जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

सोमवारी बँकेच्या मुख्य कार्यालयात संचालक मंडळाची बैठक सुरू असतानाच बरखास्तीचा आदेश प्राप्त झाला. विविध तक्रारींवर चर्चा सुरू असताना आलेल्या या आदेशामुळे बैठकीत अचानक गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. आदेशानंतर बैठक त्वरेने आटोपण्यात आली.

संचालक मंडळाची मुदत २० डिसेंबर २०२५ रोजी संपुष्टात आली होती. त्यानंतर निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात आली होती; मात्र



न्यायालयाच्या 'जैसे थे' आदेशामुळे निवडणुका लांबणीवर पडल्या. मुदत संपल्यानंतरही मंडळ कायम राहिल्याने सहकार कायद्यानुसार प्रशासक नेमण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. त्यानुसार शासनाने ही कारवाई केल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले.

दरम्यान, बँकेत काँग्रेसशी संबंधित पदाधिकाऱ्यांचे वर्चस्व असल्याने या निर्णयाला राजकीय परिमाण प्राप्त झाले आहे. विरोधकांना लक्ष्य करण्याच्या उद्देशानेच मंडळ बरखास्त करण्यात आल्याचा आरोप संबंधितांकडून करण्यात येत आहे. "निवडणूक प्रक्रिया आमच्या नियंत्रणाबाहेर होती, तरीही कारवाई करण्यात आली," असा आक्षेप माजी संचालकांनी नोंदवला आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, या निर्णयाविरोधात न्यायालयात दाद मागण्याची तयारी बरखास्त संचालकांकडून सुरू आहे. नागपूर येथे स्थगितीसाठी प्रयत्न सुरू असून, येत्या काही दिवसांत या प्रकरणाला न्यायालयीन वळण मिळण्याची शक्यता आहे.

> ■ "निवडणुकीसाठी शुल्क भरूनही प्रक्रिया पूर्ण झाली नाही. अशा परिस्थितीत मंडळ बरखास्त करण्याची गरज नव्हती. या निर्णयाचा परिणाम शेतकऱ्यांवर होऊ शकतो," अशी प्रतिक्रिया बँकेचे अध्यक्ष मनीष पाटील यांनी दिली.

दरम्यान, पीककर्ज वितरणाचा हंगाम सुरू असताना झालेल्या या घडामोडीमुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. संचालकांच्या माध्यमातून सोडवले जाणारे अनेक प्रश्न प्रलंबित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कर्जवाटप प्रक्रियेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## मारहाणीत शेतकऱ्याचा मृत्यू

प्रतिनिधी २८ एप्रिल

**उमरखेड** : तालुक्यातील विडुळ येथील शेतकरी गजानन नारायण पेदेवाड (वय ४५) यांचा मारहाणीच्या घटनेनंतर उपचारादरम्यान संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी उमरखेड पोलिस ठाण्यात मर्ग नोंद करण्यात आली असून मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

१० एप्रिल रोजी गावातील काही व्यक्तींनी पेदेवाड यांना बोलावून घेतल्यावर घरासमोर वाद झाला. या वादातून त्यांच्यावर चापट व बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. तसेच शिवीगाळ व धमकी दिल्याची तक्रार त्यांच्या पत्नी रत्नमाला पेदेवाड यांनी दिली होती. मारहाणीनंतर पेदेवाड यांची प्रकृती खालावत गेली. सुरुवातीला त्यांच्यावर स्थानिक शासकीय दवाखान्यात उपचार करण्यात आले. त्यानंतर प्रकृतीत सुधारणा न झाल्याने खाजगी रुग्णालयात आणि पुढे नांदेड येथील शासकीय रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले होते.

दरम्यान, १६ एप्रिल रोजी उपचार करून उमरखेडकडे परत येत असताना वारंगा फाटा परिसरात दुपारी प्रवासादरम्यानच त्यांचा मृत्यू झाला. मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट नसून "कशामुळे मृत्यू झाला याची माहिती नाही," असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी मर्ग नोंदवून तपास सुरू केला असून वैद्यकीय अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विनायक रामोड करीत आहेत.

# खंडाळा घाटातील हत्याकांडाचा उलगडा; लुटमारीतून केला खात्मा

प्रतिनिधी २८ एप्रिल

## एक आरोपी अटक, मोटारसायकल जप्त



**यवतमाळ** : पुसद तालुक्यातील खंडाळा घाटात लुटीच्या उद्देशाने एका ३९ वर्षीय इसमाची क्रूर हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

मृतक दिलीप महादू ढाकरे (रा. फेट्रा, ता. पुसद) यांना डोक्यात दगड मारून ठार मारण्यात आले. पुरावा नष्ट करण्यासाठी चेहरा विद्रूप करण्यात आला. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी गोपाल ऊर्फ गोलू बाळू पवार (वय २६, रा. सेवादास नगर, ता. पुसद) याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीनं ताब्यात घेतले असून, मृतकाची बजाज प्लॅटीना मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. दुसरा आरोपी अद्याप फरारी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी खंडाळा घाटातील सेवादास नगर शिवारातील ई-क्लास जमिनीवर दिलीप ढाकरे यांचे प्रेत सापडले. प्रेताची अवस्था पाहता आरोपींनी त्यांचा खून करून चेहरा पूर्णपणे विद्रूप केल्याचे दिसून आले. या प्रकरणी वसंतनगर पोलीस स्टेशनमध्ये कलम १०३(१) व २३८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से.) यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांच्या पथकाने तपास हाती घेतला. घटनास्थळी भेट देऊन बारकाईने पाहणी केली आणि मृतकाच्या नातेवाईकांच्या चौकशीतून धागेदोरे गोळा केले. तपासादरम्यान २७ एप्रिल रोजी गोपनीय माहितीवरून आरोपी गोपाल पवार याच्याकडे मृतकाची मोटारसायकल असल्याची व ती विक्री करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी कौशल्यपूर्ण कारवाई करत गोपाल पवार याला ताब्यात घेतले. प्राथमिक विचारपूसमध्ये उडवाउडवीची उत्तरे मिळाल्याने अधिक चिकाटीने चौकशी केली असता, त्याने खूनाचा कबुली दिली. आरोपी गोपाल ऊर्फ गोलू पवार व त्याचा साथीदार प्रकाश ऊर्फ पक्या उत्तम राठोड यांनी लुटीसाठी हा गुन्हा केल्याचे उघड झाले.

दोघांनी मृतक दिलीप ढाकरे यांना खंडाळा घाटात रस्त्याच्या कडेला बसलेले पाहिले. त्यांना फरफटत घाटाखाली निंबाच्या आणि काटेरी झाडाजवळ नेले. खिसे तपासून पैसे शोधले. नंतर लहान-मोठ्या दगडांनी डोक्यात वार करून चेहरा विद्रूप करत जिवंत ठार मारले आणि मोटारसायकल घेऊन पळ काढला.

या क्लिष्ट गुन्ह्याचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केला. पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात (म.पो.से.), सहाय्यक पोलिस अधीक्षक व उपविभागीय पोलिस अधिकारी पुसद हर्षवर्धन बी.जे., पोलिस निरीक्षक सतीश चवरे (स्थानिक गुन्हे शाखा) आणि पोलिस निरीक्षक दिनेश झांबरे (वसंतनगर) यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि धिरज वांडे, पोउपनि शरद लोहकरे, सफौ मुन्ना आडे, पोहवा संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, पोशि सुनिल पंडागळे, राजेश जाधव यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

सदर आरोपी गोपाल पवार याला वसंतनगर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले असून, दुसऱ्या आरोपी प्रकाश राठोडचा शोध घेण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी तपास अधिक तीव्र केला आहे.

# महिलाची छेडछाड; आरोपी जेरबंद

प्रतिनिधी २८ एप्रिल

**दिग्रस** : दिग्रस शहरात रात्रीच्या वेळी एकट्याने येणाऱ्या-जाणाऱ्या महिलांना लक्ष्य करून छेडछाड करणाऱ्या अज्ञात आरोपीला दिग्रस पोलिसांनी केवळ दोन तासांत जेरबंद करत मोठे यश संपादन केले आहे.

मागील दोन महिन्यांपासून एक अनोळखी व्यक्ती काळ्या रंगाच्या दुचाकीवरून शहरातील बंग लेआउट, भास्करवार लेआउट, व्यंकटेश नगरी आणि पाटील नगर या परिसरात फिरत होता. तो दुचाकीच्या नंबर प्लेटवर काळा स्टिकर लावून, तोंडाला गमछा बांधून महिलांच्या जवळ येऊन अश्लील शब्द वापरत, बॅड टच करून तत्काळ पळ काढत असे. या वारंवार होणाऱ्या घटनांमुळे परिसरातील महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणाची तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी त्याचे गांभीर्य ओळखले. प्रभारी अधिकारी तथा परि. सहा. पोलीस अधीक्षक डॉ. तेजस सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ तीन विशेष पथके तयार करण्यात आली. तसेच आरोपीबाबत माहिती देणाऱ्याला १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. दि. २६ एप्रिल २०२६ रोजी एका महिलेच्या तक्रारीनुसार पोलिसांनी मोहम्मद नियाजी मोहम्मद इब्राहिम (वय अंदाजे ४२, रा. दिवान नगर, दिग्रस) याच्याविरुद्ध भा.न्या.सं. कलम ७४, ७५(२), ७८(२) आणि ७९ अन्वये गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान पोलिसांनी त्वरित कारवाई करत आरोपीचा शोध घेतला आणि त्याला त्याच्या मोटारसायकलसह ताब्यात घेतले. अवघ्या दोन तासांत आरोपीला अटक करण्यात आली. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# एमडी ड्रग्ज जप्त; तीन जण अटकेत

प्रतिनिधी २८ एप्रिल

**यवतमाळ** : डॉ. अब्दुल कलाम अभ्यासिकाजवळ यवतमाळ-दारव्हा रोडवर पेट्रोलिंग करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका टाटा चारचाकी वाहनासह १.९८ ग्रॅम एमडी (मेथिलीन डायऑक्सी मेथॅम्फेटामाइन) पावडर जप्त केली आहे. तसेच अंमली पदार्थ सेवन केलेले चिलम आणि ५३,४०० रुपयांची रोख रक्कमही ताब्यात घेण्यात आली. या प्रकरणी तीन इसमाला अटक करण्यात आली आहे.

दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी यवतमाळ उपविभागांतर्गत फरार आरोपींचा शोध घेत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहर परिसरात पेट्रोलिंग केले. यावेळी डॉ. अब्दुल कलाम अभ्यासिकाजवळ टाटा कंपनीचे चारचाकी वाहन (क्र. एमएच २९ बीपी ७१७३) उभे असल्याचे दिसून आले. वाहनातील तीन इसमांच्या संशयास्पद हालचाली आणि त्यांचा नशेचा उग्र वास लक्षात घेऊन रोहीत अरवींद जाधव (वय ३०, रा. मंगलमूर्ती नगर, वडगाव, यवतमाळ), शहबाज अली सलीम अली (वय २८, रा. शारदा चौक, नवाबपुरा, यवतमाळ), इजहार अली मुस्ताक अली (वय ४७, रा. शारदा चौक, नवाबपुरा, यवतमाळ) याना थांबवुन

पंचांसमक्ष चौकशी केली असता, तिघांनी गांजा व एमडी अंमली पदार्थ सेवन केल्याचे कबूल केले. शहबाज अली याच्या पायाजवळील बॅगची तपासणी केली असता, त्यात एक पारदर्शक पिशवीत १.९८ ग्रॅम एमडी पावडर (अंदाजे किंमत १०,००० रुपये), सेवन केलेले चिलम आणि ५३,४०० रुपयांची रोख रक्कम सापडली. याशिवाय आरोपींनी वापरलेले टाटा चारचाकी वाहन (किंमत अंदाजे ४,००,००० रुपये) देखील जप्त करण्यात आले. एकूण ४,६३,५०० रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करून आरोपींना यवतमाळ शहर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले.

ही यशस्वी कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से.), अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात (म.पो.से.) आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनीष गावंडे, पोहवा अजय डोळे, रुपेश पाली, प्रशांत हेडाऊ, योगेश डगवार, रितुराज मेडवे, पोशि आकाश सूर्यवंशी व सुनील पैठणे यांच्या पथकाने पार पाडली. नशेच्या आहारी गेलेल्या तरुणांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले. यवतमाळ शहरात अंमली पदार्थांच्या तस्करी आणि सेवनावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस यंत्रणा सतर्क असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## गो-सन्मान दिनानिमित्त रॅली; उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी २८ एप्रिल

**उमरखेड** : गो-सन्मान दिनानिमित्त 27 एप्रिल रोजी उमरखेड येथे गोरक्षकांकडून गोमातेच्या सन्मानार्थ भव्य



रॅलीचे आयोजन करण्यात आले. शहरातून गोमातेला सोबत घेऊन वाजत-गाजत काढलेल्या या मिरवणुकीत "गोमातेचे रक्षण झालेच पाहिजे" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या रॅलीत मोठ्या संख्येने तरुणांचा उत्साही सहभाग दिसून आला.

रॅलीनंतर गोरक्षकांनी उपविभागीय कार्यालय गाठून उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. यावेळी ॲड. संजय जाधव, ईश्वर गोस्वामी, सुनिल शहाने, अमृते महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या समारोपाला शेकडो समर्थक उपस्थित होते.

## 'गौ सन्मान'साठी स्वाक्षरी अभियान

प्रतिनिधी २८ एप्रिल

**आर्णी** : गोमातेला 'राष्ट्रमाता' दर्जा देऊन तिच्या संरक्षणासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी आर्णीत सोमवारी स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत हजारो स्वाक्षऱ्यांसह निवेदन तहसील प्रशासनामार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात आले.

आर्णी तहसील कार्यालयात नायब तहसीलदार डॉ. संतोष आदमुलवाड आणि प्रमोद गुल्हाने यांना हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी तालुक्यातील विविध भागांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात गोमातेला सनातन परंपरेत पूजनीय स्थान असून तिच्या संरक्षणासाठी प्रभावी धोरण राबविण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. देशात गोवंश हत्येच्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. या उपक्रमात विविध सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. मोठ्या संख्येने नागरिकांनी स्वाक्षरी करून मागणीला पाठिंबा दर्शविला.

# आर्णीत विराट हिंदू संमेलन; शोभायात्रा, प्रात्यक्षिकांनी वेधले लक्ष

प्रतिनिधी २८ एप्रिल

**आर्णी** : शहरात २६ एप्रिल रोजी संत-महंतांच्या मोठ्या उपस्थितीत विराट हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. विदर्भ, मराठवाडा तसेच उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशातील संतांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष स्वरूप प्राप्त झाले. हजारो महिला-पुरुषांनी या संमेलनास उपस्थिती दर्शविली.

हिंदू सुरक्षा सेवा संघ (महाराष्ट्र राज्य) व संत प्रकोष्ठ, विदर्भ प्रांत यांच्या वतीने श्रीमद भारती विद्यालयाच्या प्रांगणात संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाचे अध्यक्षस्थान श्री १०८ महंत योगी गोपालनाथजी



महाराज (मा. तुळजाभवानी, रतनगड) यांनी भूषविले. प्रमुख उपस्थितीत श्री १००८ श्रीमंत शामसुंदरजी महाराज (आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष, जुना आखाडा, वाशिम), महंत योगीराज बापू (उखळाई मंदिर, हदगाव), श्री १०८ वेदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज (वसमत), श्री १०८ शिव चैतन्य शिवाचार्य महाराज (महादेव मठ, हदगाव), श्री १०८ विश्व चैतन्य शिवाचार्य महाराज (आष्टी, जालना), श्री १०८ सद्योजात शिवाचार्य महाराज (निर्वाणी मठ, नागठाणा, नांदेड), महंत जितेंद्रनाथ महाराज (पोहरादेवी), आचार्य पार्थ महाराज शास्त्री (वारकरी विद्यापीठ, हिंगवी गोदाकाठ, निफाड, नाशिक), ह.भ.प. मधुकरराव खोडे महाराज (इसापूर), व्यंकटेशानंद भारती स्वामी महाराज (गुमा शक्तिपीठ, हरिद्वार), डॉ. ज्ञानेश्वर भारती महाराज ऊर्फ बाळू महाराज (काकाणी, माहूर), श्री १०८ भोलेनाथजी महाराज (वाराणसी), गुरु पादेश्वर शिवाचार्य महाराज (वसमत), परमेश्वर कृष्ण चैतन्य अभयसन्यास आश्रम (करावली, राजस्थान), जनार्दन पुरी ऊर्फ योगेश महाराज (जुना आखाडा पुरी), ह.भ.प. राजेंद्र महाराज सोनोने (बुलडाणा), ह.भ.प. अमोल महाराज (आळंदी), ह.भ.प. गजानन बाबा महाराज (डोळंबावाडी), बालयोगी आदिनाथ बाबा (दाभडी), ह.भ.प. विश्वंभर महाराज (हदगाव), महंत कृष्णराज बापू महाराज (कुपटी, हदगाव) आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमास प्रमुख वक्ते अटलजी पांडे यांच्यासह आयोजक गजानन सागरबाई रामचंद्र केने महाराज, स्वागताध्यक्ष राजेश आडे, आमदार राजू तोडसाम, प्रिया तोडसाम, शामसिंह ठाकूर, करणी सेनेचे पदाधिकारी धर्मसिंह ठाकूर तसेच विविध हिंदू संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संमेलनापूर्वी शिवप्रताप चौक, देऊरवाडा येथील हनुमान मंदिरात अभिषेक व आरती करण्यात आली. त्यानंतर भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत घाटंजी येथील ढोलपथक, गजानन महाराज संस्थान डोळंबावाडी येथील वारकरी मंडळ, गणपती संस्थान खेडबीड येथील भजनी मंडळ तसेच आर्णी परिसरातील भजनी मंडळांनी सहभाग घेतला. दुर्गावाहिनीच्या कार्यकर्त्यांनी सादर केलेल्या प्रात्यक्षिकांनी विशेष लक्ष वेधले. मुख्य कार्यक्रमात वक्त्यांनी धर्म, संस्कार व सामाजिक विषयांवर मार्गदर्शन केले. समाजातील बदलत्या परिस्थितीत सांस्कृतिक मूल्ये जपण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन सागरबाई रामचंद्र केने महाराज यांनी केले. संचालन आकांक्षा तिवारी (बाभुळगाव) यांनी केले, तर आभार डॉ. शाम गुटे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता वंदेमातरम, आरती आणि महाप्रसादाने करण्यात आली. संमेलनाच्या यशस्वितेसाठी शहरातील विविध हिंदू संघटना, पदाधिकारी व नागरिकांनी सहकार्य केले.

# बोरी नदीपात्रात रेती तस्करीचा सुळसुळाट

## महसूल यंत्रणेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह; पैनगंगा काठावर मराठवाड्यातील तस्करांचे वर्चस्व

प्रतिनिधी २८ एप्रिल

**उमरखेड** : विदर्भ–मराठवाडा सीमारेषेवरून वाहणाऱ्या पैनगंगा नदीपात्रातील बोरी (चा.) हद्दीत रेती तस्करीला मोठ्या प्रमाणावर ऊत आला असून, संबंधित महसूल यंत्रणेच्या भूमिकेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. स्थानिकांच्या मते, कारवाईचा अभाव आणि कथित संगनमतामुळे तस्कर निर्धास्तपणे उत्खनन करत आहेत.

३० मार्च रोजी चातारी नदीपात्रात कारवाईसाठी गेलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला अपेक्षित पाठबळ न मिळाल्याने कारवाई न करता परतावे लागल्याची घटना घडली होती.

या प्रकारानंतर तस्करांचे मनोबल वाढल्याचे सांगितले जात आहे. सध्या बोरी (चा.) परिसरात दिवसा ढवळ्या रेती उत्खनन सुरू असून, ट्रॅक्टरद्वारे मोठ्या प्रमाणात वाहतूक केली जात आहे.



स्थानिकांच्या आरोपानुसार, काही महसूल कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हे उत्खनन सुरू असून, तक्रारी करूनही संबंधित अधिकारी प्रतिसाद देत नाहीत. काही वेळा अनोळखी क्रमांकावरून संपर्क साधल्यास तस्करांना सावध राहण्याचा इशारा दिला जात असल्याचा दावा नागरिकांकडून करण्यात येत आहे. यामुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, नदीपात्रातून उपसा केलेली रेती विना रॉयल्टी थेट जवळील कॅनल कामासाठी वापरली जात असल्याचा आरोपही होत आहे. यासंदर्भात संबंधित तलाठी यांची प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र प्रतिसाद मिळू शकला नाही.

सततच्या तक्रारीनंतरही महसूल विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

> ■ रेती तस्करीच्या घटनांबाबत प्रतिक्रिया देण्यास महसूल यंत्रणा टाळाटाळ करत असल्याचे दिसून येते. वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते स्थानिक कर्मचाऱ्यांपर्यंत मौन पाळले जात असल्याने या प्रकरणामागे नेमके काय घडते आहे, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आणि संशय व्यक्त केला जात आहे.

शासनाच्या महसुलाला फटका बसत असतानाही अधिकारी मौन बाळगत असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे.

# वादग्रस्त पेट्रोल पंप हटविण्यासाठी जनआक्रोश

## शिवप्रेमींचा मोर्चा; स्मारकाजवळील पंपावरून प्रशासनाला इशारा

प्रतिनिधी २८ एप्रिल

**उमरखेड** : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील वादग्रस्त पेट्रोल पंप हटविण्याच्या मागणीसाठी सोमवारी उमरखेड शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. शिवप्रेमी, नागरिक आणि सर्वपक्षीय नेत्यांच्या सहभागाने काढण्यात आलेल्या मोर्चातून प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

कृषी उत्पन्न बाजार समितीपासून उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या मोर्चात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. घोषणाबाजी करत मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मार्गस्थ झाला. यावेळी शहरातील प्रमुख बाजारपेठा, दुकाने व आस्थापना पूर्णतः बंद ठेवण्यात आल्या.

आंदोलनकर्त्यांच्या मते, स्मारकालगत असलेला सारडा पेट्रोल पंप अतिक्रमित असून, त्याची मुदत ३१ जुलै २०२५ रोजी संपल्यानंतरही मुदतवाढ देण्यात आल्याने नागरिकांच्या भावना दुखावल्या





आहेत. या पार्श्वभूमीवर तातडीने पंप हटविण्याची मागणी करण्यात आली.

सदर पेट्रोल पंपामुळे स्मारकाच्या सुरक्षेला धोका निर्माण होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत, भविष्यात दुर्घटना टाळण्यासाठी त्वरित निर्णय घेण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच या पंपामुळे परिसरातील वाहतूक आणि नागरिकांच्या हालचालींनाही अडथळा निर्माण होत असल्याचे सांगण्यात आले.

भारत पेट्रोलियमचे परवानाधारक दिलीप सारडा यांच्याकडे पर्यायी जागा उपलब्ध असून, पंप तात्काळ स्थलांतरित करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा कृती समितीच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनाला व्यापक लोकसमर्थन मिळाले.

या मोर्चात खासदार नागेश पाटील आष्टीकर, माजी आमदार नामदेव ससाने, प्रकाश पाटील देवसरकर, विजयराव खडसे, नितीन भुतडा, चितांगराव कदम, राम देवसरकर, तातूभाऊ देशमुख, ॲड. संतोष जैन, बाळासाहेब चंद्रे, दत्तराव शिंदे, प्रवीण पाटील मिराशे, अभय पवार, रमेश चव्हाण, ॲड. बाळासाहेब नाईक, सतीश नाईक, संदीप ठाकरे, डॉ. अजय नरवाडे, नितीन शिंदे, वीरेंद्र खंदारे, सुरेंद्र कोडगिरवार, ॲड. संजय जाधव, करुणा कुबडे, सविता कदम, सुनिता देशमुख, सपना चौधरी आदींसह शेकडो शिवप्रेमी सहभागी झाले होते. प्रशासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. त्यामुळे या प्रकरणावर शासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अमरावतीत २ मे पासून उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**अमरावती:** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे सन २०२६-२७ या वर्षासाठी ग्रीष्मकालीन क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या दि. २ मे पासून हे शिबीर सुरू होणार असून दि. १५ मेपर्यंत चालणार आहे. सदर शिबिर हे दि. २ मे पासून सुरू होणार असून सकाळी ६ ते ८ आणि सायंकाळी ५.३० ते ७ वाजेपर्यंत चालणार आहे. यासाठी अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० एप्रिल आहे. या शिबिरात एकूण १५ हून अधिक क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. तसेच व्हॉलीबॉल, सॉफ्टबॉल, बॅडमिंटन आणि धनुर्विद्या या ४ खेळांचे प्रशिक्षण राज्य शासनाच्या एनआयएस गुणवत्ताधारक प्रशिक्षकांमार्फत विनामूल्य दिले जाणार आहे. याव्यतिरिक्त तलवारबाजी, बास्केटबॉल, स्क्वॅश, नेटबॉल, शुटींगबॉल, मल्लखांब, टेबल टेनिस, थ्रोबॉल, स्केटींग, कुडो आणि बॉक्सिंग या खेळांचेही प्रशिक्षण दिले जाईल.

# बेटी बचाओ, बेटी पढाओ: समर्थ भारतासाठी स्त्री - शक्तीचा जागर

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अमरावती:** भारताच्या सामाजिक आणि आर्थिक जडणघडणीत महिलांचे योगदान अमूल्य आहे. मात्र, एकेकाळी स्त्री जन्माचे स्वागत करण्यास कचरणाऱ्या समाजात आता परिवर्तनाचे वारे वाहू लागले आहेत. केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' या महत्त्वाकांक्षी मोहिमेने केवळ शासकीय आकडेवारीच नव्हे, तर सामान्यांच्या मानसिकतेतही क्रांती घडवून आणली आहे. आज ही मोहीम केवळ घोषणा न राहता 'समर्थ भारता'चा पाया ठरत आहे.

दशकांपूर्वी घसरलेला स्त्री-जन्मदर ही देशासमोरील मोठी चिंता होती. परंतु, गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र कायद्याची कडक अंमलबजावणी आणि व्यापक जनजागृतीमुळे आज चित्र बदलले आहे. ग्रामीण भागातही आता मुलीच्या जन्मावर आनंदोत्सव साजरा केला जात आहे, ही या मोहिमेची पहिली मोठी यशप्राप्ती आहे.

केवळ मुलगी वाचवणे पुरेसे नाही, तर तिला स्वावलंबी करणे हे या योजनेचे दुसरे महत्त्वाचे पाऊल आहे. शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची निर्मिती आणि सायकल वाटप यांसारख्या उपक्रमांमुळे माध्यमिक शिक्षणातील मुलींच्या गळतीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे.

'सुकन्या समृद्धी योजने'द्वारे मुलींच्या उच्च शिक्षणासाठी पालकांची होणारी आर्थिक ओढाताण थांबली असून, भविष्यातील गुंतवणुकीचा एक सुरक्षित मार्ग उपलब्ध झाला आहे.

मुलींना सुरक्षित वातावरण देण्यासाठी सरकारने 'महिला हेल्पलाईन १८१' आणि 'वन स्टॉप सेंटर' सारख्या यंत्रणा उभारल्या आहेत. तंत्रज्ञान, संरक्षण क्षेत्र आणि क्रीडा क्षेत्रात मुलींनी मारलेली भरारी ही या सक्षमीकरणाची उदाहरणे आहेत.

जेव्हा आपण एका मुलीला शिक्षित करतो, तेव्हा आपण संपूर्ण पिढीला सुसंस्कृत करत असतो. 'लेक वाचवा, लेक शिकवा' ही मोहीम भारताला 'विश्वगुरू' बनवण्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा घटक आहे. जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी देखील 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' या मोहिमेला विशेष पाठबळ दिले होते.

आजची 'लेक' ही उद्याच्या भारताची आधारस्तंभ आहे. घराघरांतून सुरू झालेला हा स्त्री-शक्तीचा जागर जेव्हा पूर्णत्वास येईल, तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने आर्थिक महासत्ता म्हणून जगात नावाजला जाईल. गरज आहे ती फक्त आपली सामाजिक जबाबदारी ओळखून, प्रत्येक मुलीला प्रगतीची समान संधी देण्याची !

# श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर यांचा वाढदिवस वृद्धाश्रमात साजरा

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अमरावती :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या राज घराण्यातील १३ वे वंशज श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर इंदौर यांचा नुकताच वलगाव येथीलच्या श्री. संत गाडगेबाबा वृद्धाश्रमात श्रीमंत भूषणसिंह राजे होळकर जिल्हा नियोजन समिती तर्फे वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी अल्पोहारची व्यवस्था करण्यात आली. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी केलेल्या कार्याबद्दल वृद्धांना



माहिती देण्यात आली. त्याचबरोबर राजेंचे आचार विचार तसेच त्यांचे कार्य वृद्धांना सांगण्यात आले. व सर्वांनी वाढदिवस निमित्त राजेंना उदंड आयुष्य लाभो अशी गाडगेबाबा चरणी प्रार्थना केली. याप्रसंगी वृद्धाश्रम अध्यक्ष कैलाश बोरसे, निखिल घुरडे, मनोज कचरे, प्रकाशराव बोबडे, शिवहरी बोकडे, शरद तालन, मंगेश डमके, अक्षय नवरे, अमित महात्मे, पूर्ण बोरसे आदी उपस्थित होते.

# वीज वितरण कंपनीची ॲल्युमिनियम तार जप्त

प्रतिनिधी २८ एप्रिल




**अमरावती :** २७ एप्रिल रोजी स्वस्तिक स्क्रॅप सेंटर जवाहर गेट या दुकानांमध्ये महावितरणचे ॲल्युमिनियम वायर मोठ्या प्रमाणात असल्याची माहिती प्राप्त झाल्याने दुकानाची पंचासमक्ष पाहणी केली असता एकूण १७ बंडल (वजन ४६९ किलो ॲल्युमिनियम) असा १,४९,७०० रुपयाचा मुद्देमाल आढळला. सदर स्क्रॅप सेंटरचे मालक निरंजन संजय अग्रवाल वय २५ राहणार जवाहर गेट यांना मालाबाबत विचारणा केली असता कोणत्याही मालकी हक्काबाबतचे कागदपत्रे किंवा इतर पुरावे सादर केलेले नाहीत. सदरचा मुद्देमाल हा चोरीचा असल्याचा दाट संशय असल्याने तो जप्ती पंचनामाप्रमाणे जप्त करण्यात आलेला आहे. मुद्देमाल पोलीस स्टेशन खोलापुरी गेट येथे जमा करण्यात आला.


# धारणी वनपरिक्षेत्रात भीषण आग

प्रतिनिधी २८ एप्रिल

## चित्री- लवादा वर्तुळात कोट्यवधींची वनसंपदा नष्ट

**धारणी:** धारणी प्रादेशिक वन परिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या चित्री-लवादा वर्तुळात लागलेल्या एका भीषण आगीने हाहाकार उडवून दिला आहे. या आगीच्या भडक्यात कोट्यवधी रुपयांची मौल्यवान वनसंपदा जळून खाक झाली आहे. अनेक हेक्टर क्षेत्रावर पसरलेले हे दाट जंगल पूर्णपणे नष्ट झाले.

आगीची तीव्रता इतकी प्रचंड होती की, वनविभागाचे प्रयत्नही त्यापुढे अपुरे ठरले.कडाक्याची उष्णता, कोरडे हवामान आणि सोसाट्याचा वारा यामुळे आगीचा फैलाव अत्यंत वेगाने झाला. अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी तातडीने दाखल झाले; मात्र, पुरेशा संसाधनांच्या अभावामुळे आग नियंत्रणात आणताना त्यांना प्रचंड अडचणींचा सामना



करावा लागला. या विनाशकारी आगीत दुर्मिळ औषधी वनस्पती, गगनचुंबी वृक्ष, वन्यजीव, पक्षी आणि इतर अनेक लहान जीवांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. संपूर्ण परिसर धुराने व्यापला गेला होता, ज्यामुळे निसर्गाचाच जणू श्वास कोंडत आहे, असे वातावरण निर्माण झाले होते.

उन्हाळ्याच्या दिवसांत अशा घटना दरवर्षी घडत असूनही, वनविभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांची ठोस अंमलबजावणी करण्यात अपयश मिळवले आहे, यावरून स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. 'आगीच्या रेषा जनजागृती मोहीम आणि आधुनिक संसाधनांची व्यवस्था का करण्यात आली नाही?' असे थेट प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. या घटनेमुळे प्रशासन आणि वनविभाग या दोघांच्याही कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रभावी आणि जबाबदार उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# मातंग समाजासाठी सोमवारी विशेष कार्यशाळा

**अमरावती:** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयातर्फे मातंग समाज व तत्सम बारा पोट जातीतील वंचित घटकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा सोमवार, दि. ४ मे रोजी दुपारी ११ वाजता सामाजिक न्याय भवनात होणार आहे. कार्यशाळेत मातंग समाजातील नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्या येणार आहे. समाजातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी योजना फायदेशीर ठरत असल्याने यावेळी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्राचा आधार

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अमरावती :** भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत राबविल्या जाणाऱ्या 'मिशन शक्ती' या महत्त्वाकांक्षी मोहिमेअंतर्गत अमरावती जिल्ह्यात 'जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्र' महिलांच्या प्रगतीसाठी सज्ज झाले आहे. महिलांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती एकाच छताखाली मिळावी आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण व्हावे, या उद्देशाने या केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. हे केंद्र मुख्य पोस्ट ऑफिसच्या बाजूला, जुने तहसील कार्यालय, अमरावती येथे आहे.

आजच्या काळात महिला सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या सक्षम होणे काळाची गरज आहे. मात्र, अनेकदा माहितीच्या अभावामुळे गरजू महिला शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून वंचित राहतात. ही दरी भरून काढण्यासाठी जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्र हे एक 'वन स्टॉप सपोर्ट सिस्टम' म्हणून काम करणार आहे. या केंद्रामार्फत ग्रामीण व शहरी भागातील महिला, विशेषतः विधवा, घटस्फोटित, पीडित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना प्राधान्याने मार्गदर्शन केले जाते.

या केंद्राच्या मुख्य कार्याविषयी माहिती देताना जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, हे केंद्र केवळ माहिती देण्याचे काम करणार नाही, तर विविध सरकारी विभागांमध्ये समन्वय साधून महिलांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करेल. यामध्ये प्रामुख्याने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, उज्ज्वला योजना, सुकन्या समृद्धी आणि महिला बचत गटांच्या बळकटीकरणावर भर दिला जाणार आहे. तसेच, ज्या महिलांना कायदेशीर सल्ला, कौशल्य प्रशिक्षण किंवा रोजगाराची आवश्यकता आहे, त्यांनाही येथे योग्य दिशा दाखवली जाते.

जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्रात जिल्हा समन्वयक आणि तज्ज्ञ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, जे महिलांच्या तक्रारींची नोंद घेऊन त्यावर तत्परतेने कार्यवाही करतात. तसेच जिल्ह्यातील 'सखी वन स्टॉप सेंटर' आणि महिला हेल्पलाईन (१८१) यांच्याशी हे केंद्र थेट जोडलेले असल्याने संकटग्रस्त महिलांना तात्काळ मदत मिळणे सुलभ झाले आहे.

अमरावती जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिलांनी आपल्या हक्कांच्या आणि संरक्षणाच्या माहितीसाठी, तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाशी किंवा जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. महिलांच्या स्वावलंबनाकडे टाकलेले हे पाऊल जिल्ह्याच्या सामाजिक विकासासाठी नक्कीच दिशादर्शक ठरेल.

# १३ अवैध तंबाखू विक्रेत्यांकडून दंड वसूल

**अमरावती:** शहरातील सार्वजनिक आरोग्य अबाधित राखण्यासाठी आणि तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शहराच्या मुख्य बाजारपेठेत कारवाई करण्यात आली. या कारवाईत १३ अवैध तंबाखू विक्रेत्यांकडून दंड वसूल करण्यात आला. जिल्हा सामान्य रुग्णालयाचा राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, सिटी कोतवाली पोलीस स्टेशन आणि संभाजीनगर येथील मराठवाडा ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त पथकाने ही मोहीम राबवली. शहरातील गांधी चौक, अंबादेवी मंदिर परिसर, राजकमल चौक आणि श्याम चौक या ठिकाणी ही तपासणी करण्यात आली. यावेळी तंबाखू नियंत्रण कायदा २००३ मधील कलम ४ सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान बंदी आणि कलम ६ अ मध्ये १८ वर्षांखालील मुलांना तंबाखू विक्री करण्यास बंदी याचे उल्लंघन करणाऱ्या अवैध विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

# पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्डद्वारे पशुपालकांना ३ लाखांपर्यंत अर्थसहाय्य

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अमरावती:** राज्यातील पशुपालकांना आर्थिक बळकटी देण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' मोहिम राबविण्यात येत आहे. या योजनेतून पात्र पशुपालकांना ३ लाख रुपयांपर्यंत कर्जसुविधा उपलब्ध होणार असल्याची माहिती आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी दिली. राज्यातील पशुपालन, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन व वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना पशुधनाच्या देखभालीसाठी व दैनंदिन खर्चासाठी आकर्षक व्याज सवलतीसह कर्ज दिले जाते. ज्यांच्याकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंत विनातारण कर्ज उपलब्ध होणार असून दूध संस्थेची हमी असल्यास ही मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढवता येते. ज्या पशुपालकांकडे आधीच किसान क्रेडिट कार्ड आहे, त्यांनाही पतमर्यादा वाढवून ३ लाख रुपयांपर्यंत लाभ घेता येणार आहे.

कर्जाचा मूळ व्याजदर ९ टक्के असला तरी नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाकडून ३ टक्के व राज्य शासनाच्या ११ फेब्रुवारी २०२५ च्या निर्णयानुसार ४ टक्के अशी एकूण ७ टक्क्यांपर्यंत व्याज सवलत मिळते. बँकांकडूनही २ टक्के सवलत दिल्याने नियमित परतफेड करणाऱ्या पशुपालकांना शून्य टक्के व्याजदराचा लाभ मिळू शकतो. सन २०२६-२७ पासून मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेंतर्गतही या कार्डद्वारे खेळते भांडवलाचा लाभ मिळणार आहे. राज्यातील १० लाख पात्र पशुपालकांना या योजनेच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट विभागाने ठेवले आहे.

दूध सोसायटी, दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद असलेले व अद्याप योजनेचा लाभ न घेतलेले पशुपालक या मोहिमेसाठी पात्र असून जिल्ह्यात पशुसंवर्धन उपआयुक्त हे योजनेचे संनियंत्रण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. सध्या पशुपालन करणाऱ्या व लाभ न घेतलेल्या सर्व पात्र पशुपालकांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे.

योजनेसाठी प्रकल्प धारकाने केंद्र, राज्य शासन किंवा जिल्हा परिषदेच्या अन्य अनुदान योजनांचा लाभ घेतलेला नसावा. सर्व पशुधनाची एनडीएलएम पोर्टलवर नोंद आवश्यक आहे. व्याज सवलत ही ठराविक किमान पशुधन संख्या असलेल्या पशूपालकांनाच लागू राहील. यामध्ये २५ हजार मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५० हजार अंडी उत्पादक पक्षी, ४५ हजार क्षमतेचे हॅचरी युनिट, १०० पर्यंत दुधाळ जनावरे, ५०० पर्यंत मेंढी किंवा शेळी गट व २०० पर्यंत वराह यांचा समावेश आहे.

# 'किसान ड्रोन ऑपरेटर' प्रशिक्षणातून महिला झाल्या हायटेक

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अमरावती:** कृषी क्षेत्रात सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचे वारे वाहत असून, त्यात ड्रोन तंत्रज्ञान क्रांती घडवून आणत आहे. हेच तंत्रज्ञान आता ग्रामीण भागातील महिलांच्या हातात विसावले असून, अमरावती जिल्ह्यातील महिलांनी 'ड्रोन ऑपरेटर' म्हणून नवे क्षितिज गाठले आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि डाखरे महाराज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या 'किसान ड्रोन ऑपरेटर' प्रशिक्षण कार्यक्रमातून ८३ महिलांनी यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करून स्वावलंबनाकडे पाऊल टाकले आहे. या उपक्रमातंर्गत डाखरे महाराज फाउंडेशनच्या मॅनेजिंग डायरेक्टर संप्रदा डाखरे यांनी ग्रामीण महिलांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण दिले.



सन २०२४-२५ व २०२५-२६ या कालावधीत 'किमान कौशल्य विकास कार्यक्रम' अंतर्गत हे प्रशिक्षण प्रामुख्याने भातकुली तालुक्यातील महिलांसाठी आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणादरम्यान महिलांना ड्रोनचे तांत्रिक ज्ञान, त्याचे विविध घटक, ड्रोन उड्डाणाचे तंत्र , आणि कृषी क्षेत्रात औषध फवारणीसाठी ड्रोनचा प्रभावी वापर कसा करावा, याचे सखोल सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. तसेच, उड्डाणादरम्यान पाळावयाचे सुरक्षा नियम आणि शासकीय मार्गदर्शक तत्त्वांचीही माहिती देण्यात आली.

या अभिनव उपक्रमाला जिल्हा कौशल्य विकास केंद्रामार्फत मार्गदर्शन आणि तांत्रिक सहकार्य लाभले. प्रशिक्षणाच्या दखल घेत तत्कालीन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी प्रत्यक्ष केंद्राला भेट देऊन प्रशिक्षणार्थी महिलांशी संवाद साधला आणि ग्रामीण भागातील महिलांचा हा तांत्रिक आत्मविश्वास पाहून उपक्रमाचे कौतुक केले. या प्रशिक्षणामुळे केवळ ८३ महिलांना कौशल्य मिळाले असे नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेत एक नवीन रोजगाराची संधी निर्माण झाली आहे. आज या महिला शेतीमध्ये आधुनिक ड्रोनच्या सहाय्याने फवारणी करण्यासाठी सज्ज झाल्या असून, त्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली आहे. शासनाच्या कौशल्य विकास धोरणाला प्रभावी हातभार लावणारा हा प्रकल्प कृषी क्षेत्रात महिलांच्या सहभागाचे एक नवीन आणि आधुनिक उदाहरण ठरला आहे.

# छत्री तलाव येथे साफ- सफाईच्या अभियानाने आ. रवी राणा यांनी जनसेवा दिवसाची केली सुरुवात

प्रतिनिधी २८ एप्रिल

**अमरावती :** आमदार रवी राणा व भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी वायएसपीचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, मनपा अधिकारी व कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांच्या सोबत तलावातील साचलेला गाळ, तलावातील गोटे, काचेचे तुकडे, पवित्र देव देवीच्या मूर्ती काढुन योग्य ठिकाणी ठेवल्या. जनसेवा दिवसानिमित्य स्वच्छतेच्या माध्यमातुन छत्री तलावाला कायम स्वरुपी स्वच्छ व सुंदर करण्याकरीता केला निर्धार केला.

भविष्यामध्ये छत्री तलाव पर्यटनाला चालना मिळण्याकरीता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे महसुल मंत्री तथा पालकमंत्री यांच्याकडे छत्री तलाव विकासाकरीता २५ कोटी रुपयाची करणार मागणी – यामध्ये छत्री तलावाचे सौदर्यीकरण तसेच छत्री तलाव परीसरामध्ये छत्रपती



शिवाजी महाराजाचा भव्यदिव्य पुतळा बसविणार, पर्यटकांसाठी ०४ बोटी वाढविणार तसेच तलावामध्ये तरगते रेस्टारेंट सुरु करणार आहे.

आमदार रवी राणा यांचा वाढदिवस जनसेवा दिवस म्हणून साजरा केला जातो आहे. आ.रवी राणा यांच्या सोबत सहभागी झालेल्या साफ सफाई अभियानातील वायएसपीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, मनपा अधिकारी व कर्मचारीत तसेच इतर उपस्थित नागरीकांना एक झाड व प्रमाणपत्र देऊन आ.रवी राणा यांनी केला सत्कार केला. आमदार रवी राणा यांच्या ‖जनसेवा दिवस‖ म्हणून विविध उपक्रमांची सुरुवात करण्यात आली. याच पार्श्वभूमीवर आज सकाळी छत्री तलाव परिसरात स्वच्छता अभियान राबवून या दिवसाची सुरुवात केली.

आमदार रवी राणा यांनी सांगितले की, छत्री तलावाचे सौंदर्यीकरण करून या ठिकाणाला पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यात येणार आहे. भविष्यामध्ये छत्री तलाव पर्यटनाला चालना मिळण्याकरीता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व महसूल मंत्री तथा पालकमंत्री यांच्याकडे २५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात येणार आहे. या विकास आराखड्यात तलाव परिसराचे सुशोभीकरण, छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारणे तसेच तलावामध्ये तरंगते रेस्टॉरंट सुरू करण्याचा प्रस्ताव समाविष्ट असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी सुनील राणा, निळकंठराव कात्रे, जयंतराव वानखडे, शैलेंद्र कस्तुरे, अजय गाडे, शिवदासजी घुले, सुखदेव तरडेजा, दादाराव महल्ले, उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले, शिक्षण सभापती अॅड. प्रिती बनारसे, माजी महापौर संजय नरवने, नगरसेवक प्रा. प्रशांत वानखडे, अजय जयस्वाल, किशोर जाधव, महेश मुलचंदानी, रजनी डोंगरे, गौरी मेघवानी, अर्चना पांडे, प्रियंका पाटने, योगेश विजयकर, स्विकृत नगरसेवक अॅड.प्रशांत देशपाडे, स्विगृत नगरसेवक संजय हिंगासपुरे, नंदा सावदे, डॉ. मधुरा कहाळे, दीपक साहू सम्राट, किशोर पिवाल, नितीन बोरेकर, सोनाली नवले, अर्चना तालन, बाळु इंगाले, राजा बांगडे, उमेश ढोणे,किरण म.अंबाडकर, हर्षल रेवणे, संदिप कांबळे, तुषार दुधे, श्याम कथे, भुषण पाटने, सपना ठाकुर, इंजि.मिलींद कहाळे, अरुणा चचाणे, अशोक पांडे, बंडु डकरे, वंदना जामनेकर,शैलेश मेघवानी, शैलेश शिरभाते, सुचिता गोडे, अश्विनी झोड, अविनाश काळे, आशिष कावरे, राजु हरणे, श्रीकृष्ण बैलमारे, देवानंद राठोड, ओंकार माहोड, निरज गवई, नरेंद्र तलखेडे, संजय माहुलकर, संदिप कांबळे, मुस्ताकभाई, राजा बाखडे, स्वप्नील चाफले, रवि विरुळकर, देवा शेंडे,सुनिल तरडेजा, प्रशांत कावरे, अजय घुले, निता खडसे, अर्जुन दाते, यांच्यासह वायएसपीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मनपा अधिकारी व कर्मचारी तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि २८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# व्यवस्थाच झाली भ्रष्टाचारी, कोण घेणार खबरदारी!

***चौकशी अहवाल येऊनही कारवाई नाही *अधिकाऱ्यांवरच संशयाची सुई *पोकरा योजनेतील घोटाळा दडपला**




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जागतिक बँक सहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजनेतील कथित लाखों रुपयांच्या गैरव्यवहाराचे प्रकरण जाणीवपूर्वक दडपले जात असल्याचा आरोप तक्रारदार यांनी केला आहे. परिणामी संपूर्ण व्यवस्थाच भ्रष्टाचारी झाल्याने कोण घेणार खबरदारी? असा प्रश्न उपस्थित होत आहे. मात्र शासन राबवित असलेल्या विविध योजनात टक्केवारीचा खेळ सर्रास सुरू असल्याने सबंधित अधिकारी, कर्मचारी, स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी आणि दलाल स्वतःच्या आर्थिक तुंबड्या भरून घेत असल्याचे वास्तव समोर येत आहे. जिल्ह्यातील पोकरा घोटाळा उघड होऊनही कारवाई होत नाही त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे संशयाची सुई झुकत आहे.

### खबरदारी घेणार कोण....

शासनाच्या कुठल्याही योजनांचा लाभ मिळवण्यासाठी गोरगरिबांना सबंधित कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. त्यातच टक्केवारी देण्यास नकार दिला तर पात्र असूनही अपात्र ठरविण्यात येते हा सबंधित प्रशासनातील अलिखित नियमच झाला आहे. तर दुसरीकडे बोगस कागदपत्रांच्या आधारावर अपात्र लाभार्थ्यांच्या खात्यात लाखों रुपये जमा करण्यात येतात ही व्यवस्थेसाठी शरमेची बाब आहे. एखाद्याने तक्रार केली तर तालुका स्तरापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत एकच साखळी असल्याचे दिसून येत आहे. याबाबत तक्रारदार यांनी पाठपुरावा केला तर ' चौकशी सुरू ' आहे हे एकच उत्तर अधिकाऱ्यांकडे असते. सबळ पुरावे जोडल्याचा दाखला दिला तर, उपविभागीय कृषी अधिकारी म्हणतात तत्कालीन कृषी अधिकारी बदलून गेले आहेत. त्यामुळे चौकशीला वेळ लागत असल्याचे हास्यास्पद उत्तर देण्यात येत आहे. हीच मोठी आजच्या व्यवस्थेची शोकांतिका आहे. परिणामी हे असेच सुरू राहिले तर अशा गंभीर प्रकाराची खबरदारी घेणार कोण ? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात पोकरा भाग - १ मधील गैरव्यवहाराने कृषी विभागाचे पितळ उघडे पडले असून, ठिंबक सिंचन, शेडनेट हाऊस व बोगस फळबाग लागवड आदी घटकात मोठा अपहार झाल्याचे सिद्ध झाले आहे. या बाबत राज्याचे मुख्यमंत्री आणि वरिष्ठ स्तरावर तक्रार दाखल झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री तक्रार निवारण कक्षाने सबंधित विभागाला तपास करून चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने तंत्र अधिकारी अनिल राठोड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. त्यांनी पारदर्शक चौकशी करून अहवाल वरिष्ठांकडे सादर केला होता. मार्गदर्शक तत्वानुसार तक्रारदार यांना सदर चौकशी अहवालाची प्रत देणे अपेक्षित होते. मात्र अधीक्षक जिल्हा कृषी अधिकारी यांनी शिफारस करून सदर अहवाल कृषी सहसंचालक अमरावती यांच्याकडे सादर केला. त्यावरुन कृषी सहसंचालक यांनी कारवाईचे आदेश दिले होते. मात्र जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी काय शिफारस केली हे अजूनही गुलदस्त्यातच आहे. एकाच कुटुंबात लाखों रुपयांचे अनुदान देण्यात आल्याचे पुरावे सादर करूनही केवळ फळबाग जिवंत दिसत नाही या एका शेऱ्याखाली केवळ फळबाग अनुदान सबंधित शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात यावे असा आदेश काढण्यात आला. आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोषी आढळल्यास कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तेंव्हा पासून हे घोटाळा प्रकरण थंडबस्त्यात पडले असून, मालेगांव येथील तालुका कृषी अधिकारी चौकशी करत असल्याचे सांगण्यात येत आहे. तर सबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यांनी आपल्याकडे कुठलीही चौकशी करण्याची जबाबदारी देण्यात आली नाही असे स्पष्ट केले आहे. हा सर्व बनवाबनविचा प्रकार असून तक्रारदार यांची केवळ दिशाभूल करण्यात येत असल्याचे बोलले जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार सदर गंभीर गैरव्यवहाराची चौकशी होऊन जवळपास तीन महिन्यांचा कालावधी उलटूनही सबंधित दोषींवर कारवाई होत नाही. त्यामुळे संपूर्ण व्यवस्थाच भ्रष्टाचारी झाली असल्याचे उजागर होत आहे. वास्तविक पाहता, ज्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घोटाळा केला असताना त्या गैरव्यवहाराची चौकशी त्याच विभागातील एका तालुका स्तरीय अधिकाऱ्यांकडे सोपविणे म्हणजे, चोरांच्या हाती चाबी देण्याचा प्रकार असल्याचे सामान्य नागरिक बोलत आहेत. परिणामी ज्यांनी पैसे खाल्ले त्यांनाच वाचवले जात आहे. हीच का शासनाची शेतकरी हिताची भूमिका ? असा सवाल उपस्थित होत आहे.

# 'पूर्व उल्लंघन' संकल्पनेचा खुलासा, हायकोर्टाचा कंत्राटदाराला दिलासा!

***टेंडर अपात्रतेसंदर्भात मर्यादा स्पष्ट**
***निविदाप्रक्रियेत हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निकाल**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●





शासकीय निविदाप्रक्रियेतील पारदर्शकता आणि न्यायतेच्या दृष्टीने मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. निविदाप्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या 'पूर्व उल्लंघन' या संकल्पनेची व्याप्ती स्पष्ट करत न्यायालयाने कंत्राटदारांना दिलासा दिला आहे.अकोला येथील राजराजेश्वर कन्स्ट्रक्शन या संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) वन भवन इमारत बांधकामासाठी निविदा सादर केली होती. मात्र इंटिग्रिटी पॅक्टच्या कथित उल्लंघनाचे कारण देत या संस्थेला अपात्र ठरविण्यात आले. ही कारवाई महानगरपालिकेच्या एका पत्रावर आधारित होती, ज्यामध्ये संस्थेच्या पूर्वीच्या कामात त्रुटी असल्याचे नमूद करण्यात आले होते.

राज्य सरकारच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, अर्जदाराने या पूर्व उल्लंघनाची माहिती लपवून ठेवली. त्यामुळे महानगरपालिकेच्या पत्राच्या आधारे त्यांना अपात्र ठरविणे कायदेशीर आहे. राजराजेश्वर कन्स्ट्रक्शनतर्फे ज्येष्ठ अधिवक्ता ॲड. कफतान, ॲड. धर्माधिकारी आणि ॲड. गोरांग भाकरे यांनी बाजू मांडली. त्यांनी असा युक्तिवाद केला की, महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असून ती शासकीय विभाग किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम या श्रेणीत येत नाही. न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरला आणि या बाबी स्पष्ट केल्या.

**निर्णयाचे महत्त्व**

या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासकीय विभाग यांच्यातील फरक अधोरेखित झाला आहे. निविदाप्रक्रियेत अपात्रतेचे निकष हे केवळ कायदेशीर चौकटीतच लागू केले जावेत, याची खात्री या निकालामुळे कंत्राटदारांना मिळाली आहे. त्यामुळे भविष्यात निविदाप्रक्रियेत अधिक स्पष्टता आणि पारदर्शकता येण्यास मदत होणार आहे. उल्लंघन हे केवळ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा शासकीय विभागाशी संबंधित असावे लागते. महानगरपालिकेच्या कामांमधील कथित त्रुटी पूर्व उल्लंघन या संज्ञेत मोडत नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यायालयात स्पष्ट केले की, महानगरपालिकेच्या शिफारसीवरून अर्जदाराला काळ्या यादीत टाकले जाणार नाही किंवा भविष्यातील निविदांपासून वंचित ठेवले जाणार नाही.

**काय आहे प्रकरण...**

अकोला येथील राजराजेश्वर कन्स्ट्रक्शन या संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 'वन भवन' इमारत बांधकामाच्या निविदेत सहभाग घेतला होता. मात्र, एका महानगरपालिकेने दिलेल्या पत्राच्या आधारावर या संस्थेने पूर्वीच्या कामात त्रुटी ठेवण्याचा ठपका ठेवून 'इंटिग्रिटी पॅक्ट'च्या उल्लंघनाखाली त्यांना अपात्र ठरवण्यात आले होते. न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान या प्रकरणावर महत्त्वाचे कायदेशीर मुद्दे समोर आले.

**राज्य सरकारचा पक्ष :** अर्जदाराने पूर्व उल्लंघनाची माहिती लपवली असून महानगरपालिकेच्या पत्राच्या आधारे केलेली अपात्रता योग्य आहे, असा युक्तिवाद सरकारी पक्षाने केला.

**अर्जदाराचा युक्तिवाद :** महानगरपालिका ही 'शासकीय विभाग' किंवा 'सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम' नसून ती एक स्थानिक स्वराज्य संस्था आहे. त्यामुळे तिने दिलेल्या पत्रावर आधारित अपात्रता ग्राह्य धरता येणार नाही.

**न्यायालयाचे निरीक्षण :** न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य केला. 'इंटिग्रिटी पॅक्ट'नुसार 'पूर्व उल्लंघन' हे केवळ शासकीय विभाग किंवा सार्वजनिक क्षेत्राशी संबंधित कामांबाबत लागू होऊ शकते. महानगरपालिकेच्या कामांमधील कथित त्रुटी या संज्ञेत मोडत नाहीत.

**बांधकाम विभागाचे प्रतिज्ञापत्र :** भविष्यातील निविदांवर कोणताही परिणाम होणार नाही, असे सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यायालयात स्पष्ट केले. संबंधित महानगरपालिकेच्या शिफारसीनुसार अर्जदार संस्थेला काळ्या यादीत टाकले जाणार नाही किंवा कोणत्याही निविदा प्रक्रियेपासून वंचित ठेवले जाणार नाही.

## थोडक्यात

### बाकलीवाल विद्यालयाच्या एनसीसीची 'ए' प्रमाणपत्र परीक्षेत गगनभरारी

**सलग १०० टक्के निकालाची परंपरा कायम**

**वाशीम :** शिस्त, जिद्द आणि कठोर परिश्रमाचे प्रतीक असलेल्या एनसीसी (राष्ट्रीय छात्र सेना) विभागात वाशिम येथील श्री बाकलीवाल विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. ११ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, अकोला यांच्या वतीने घेण्यात आलेल्या 'ए' प्रमाणपत्र परीक्षेत विद्यालयाने १०० टक्के निकालाची आपली दैदीप्यमान परंपरा कायम राखली आहे.

**CHANGE OF NAME**

My Old name –
SHEKH KHAWJA FARID
My new name -
Shekh khaja Shekh Farid
FATHER NAME -
SHEKH FARID SHEKH MALANG
MY address:
WARD NO 04 GAIBI PURA Risod
TQ - RISOD DIST - WASHIM
MAHARASHTRA-444506

**जुने नाव : शेख खाजा फरीद**
**नवीन नाव : शेख खाजा शेख फरीद**

वाशीम बस स्थानकात...

# एस टी बस कर्मचाऱ्यांची दादागिरी, गरीब विक्रेत्यावर पडली भारी!

***घटनेचा व्हिडिओ व्हायरल**
***दोषींवर कारवाईची मागणी**
***पोलीस कारवाईकडे लक्ष**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम येथील बस स्थानक परिसरात गोळ्या-बिस्कीट विक्री करणाऱ्या एका गरीब व्यक्तीला एसटी बसच्या ३ ते ४ कर्मचाऱ्यांनी सिनेस्टाईल बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून संतप्त नागरिकांकडून मारहाण करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

प्राप्त माहितीनुसार वाशीम बस स्थानकावर गोळ्या-बिस्कीट विक्री करणाऱ्या व्यक्तीचा एका बस चालक व वाहकासोबत किरकोळ वाद झाला होता. सुरुवातीला शाब्दिक वाद झाल्यानंतर काही वेळातच प्रकरण चिघळले. त्यानंतर ३ ते ४ बस कर्मचाऱ्यांनी मिळून संबंधित विक्रेत्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरवात केली.इतकेच नव्हे तर तो व्यक्ती जमीनीवर पडल्यावर देखील त्यावर लाथा टाकण्यात आले. या घटनेवेळी बसमध्ये प्रवास करणारे प्रवासी तसेच उपस्थित नागरिकांनी संपूर्ण घटना मोबाईलमध्ये कैद केली. हा व्हिडिओ सोशल मीडियावर





व्हायरल झाल्यानंतर बस स्थानक प्रशासन व संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.दरम्यान, गरीब विक्रेत्यावर झालेल्या मारहाणीचा व्हिडिओ पाहून नेटकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून दादागिरी करणाऱ्या दोषी कर्मचाऱ्यांना निलंबित करून कठोर कारवाईची मागणी केली जात आहे. मात्र या प्रकरणी वाशीम पोलीस विभाग आणि एसटी प्रशासनाकडून पुढे कोणती कारवाई केली जाते. याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नात्यातील व्यक्तीलाच नोकरी देण्याचा करार!

*** रमीज खान आणि अलीम खान यांची एसआयटीकडे तक्रार**
***रिसोडच्या अल-हिलाल अल्पसंख्यांक शिक्षण संस्थेचा अफलातून फंडा**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

रिसोड येथील कथित आणि गैरप्रकारात अव्वल असलेल्या अल-हिलाल अल्पसंख्यांक शिक्षण प्रसारक व समाज कल्याण संस्थेद्वारा संचालीत शाळा, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये फक्त संस्थाचालकांच्या रक्तसंबंधातील व्यक्तींना नियुक्त्या दिल्या जातात. या संस्थेद्वारा संचालीत सर्व शाळेतील बोगस नियुक्त्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी रिसोड येथील अन्यायग्रस्त बेरोजगार रमीज खान अकबर खान आणि मालेगाव पंचायत समितीचे माजी सदस्य अलीम खान उस्मान खान यांनी एसआयटीचे प्रमुख चंद्रकांत पुलकंडवार आणि राज्याचे अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांचेकडे केली आहे.

या तक्रारीने कथित संस्थाचालक, त्यांचे पाठीराखे अधिकारी आणि रक्ताच्या नात्यातील सर्व लाभार्थीमध्ये खळबळ उडाल्याची चर्चा आहे. या तक्रारीत तक्रारकर्ते रमीज खान आणि


मंगळवार दि २१ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

रिसोडच्या डॉ. अल्लमा इकबाल उर्दू शाळेतील गैरप्रकार चव्हाट्यावर!

अलीम खान यांनी अल-हिलाल अल्पसंख्यांक शिक्षण प्रसारक मंडळ व समाज कल्याण संस्था, रिसोड चे सर्वेसर्वा असलेले संस्था सचिव कबीर मोहसीन शेख अहेमद यांनी त्यांच्या संस्थेला धार्मिक (मुस्लीम) आणि भाषिक (उर्दू) दर्जाचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्र शासनाकडून प्राप्त केले आहे.

शिक्षण क्षेत्रातील काळ्याबाजाराचे ज्ञान प्राप्त असलेल्या कथित संस्थाचालकाने 'या' संस्थेद्वारा संचालीत शाळेमध्ये पदभरतीसाठी आवश्यक असलेली विद्यार्थी पटसंख्या उपलब्ध नसताना शालेय परिसराच्या बाहेरील, परगावातून विद्यार्थ्यांचे दाखले तस्करी करून विद्यार्थ्यांचा फुगवटा निर्माण केला आहे.बोगस पटसंख्या दाखवून बेकायदेशीररित्या स्वत:च्या मुला, मुलींसह रक्त संबंधातील अनेक नातलग व्यक्तीच्या नियुक्त्या केल्याचा आरोप केला आहे.या संस्थेद्वारा संचालीत सर्व शाळांमध्ये बाहेर गावातील विद्यार्थ्यांचे दाखले तस्करी करून पटसंख्या वाढवून पदभरती केल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे. या शाळांची अचानकपणे पटपडताळणी केल्यास सर्व गैरप्रकार उघडकीस येतील असा दावा ही तक्रारकर्त्यांनी वरिष्ठांना दिलेल्या तक्रारीत केला आहे. कथित संस्थाचालकाने समाजसेवेच्या नावावर मुस्लीम समाजातील गरजू, होतकरु, पात्रताधारक उमेदवारांना शाळेवर नोकरी लावुन देण्याचे आमिष दाखवून अनेक अन्यायग्रस्त बेरोजगारांना लाखो रूपयांनी गंडविल्याचा आरोपरी तक्रारकर्त्यांनी वरिष्ठांना दिलेल्या तक्रारीत केला आहे. कथित संस्थाचालकाने रिसोड शहरासह वाशीम शहरात आणि जवळच असलेल्या मराठवाड्यातील सेनगाव तालुक्यातही आपली दुकानदारी सुरू करून रक्ताच्या नात्यातील लोकांना नियुत्त्या देवून शासनाकडून दरवर्षी अल्पसंख्यांक संस्थांना पायाभूत सुविधेसाठी मिळणारा लाखो रूपयाचा निधी सुद्धा कागदोपत्री कामे दाखवून स्वा:हा केल्याचा आरोप ही तक्रारकर्त्यांनी केला आहे. वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिकारी, अमरावती विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील भ्रष्ट अधिकारी कथित संस्थाचालकाचे पाठीराखे असल्यामुळे एसआयटीने अमरावती विभागाच्या बाहेरील वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी करून सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करावी अशी मागणीही तक्रारकर्ते रमीज खान यांनी वरिष्ठांकडे केली आहे.

अत्याधुनिक सुविधांसह रुग्णसेवेचा नवा अध्याय...

# रिसोड येथे जिजाऊ रुग्णालयाचे नव्या वास्तूत स्थानांतरण







● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

**शहरात गेल्या दहा वर्षांपासून अविरत रुग्णसेवा देणाऱ्या जिजाऊ रुग्णालयाचे नव्याने बांधण्यात आलेल्या सुसज्ज इमारतीत थाटात स्थानांतर करण्यात आले. दि. २५ एप्रिल रोजी शहरातील बसस्थानकासमोर डॉ. साबू यांच्या रुग्णालया जवळ विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम थाटामाटात संपन्न झाला. अत्याधुनिक सोईसुविधांसह रुग्णसेवेचा नवा अध्याय सुरु झाल्याने डॉ. अमोल नरवाडे व डॉ. सौ. करुणा नरवाडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला.**

शहरात मागील दहा वर्षांपासून अखंड रुग्णसेवा करून नावारुपास आलेल्या येथील जिजाऊ हॉस्पीटल प्रसुती व स्त्री रुग्णालयाचे स्थलांतरण व भव्य शुभारंभ २५ एप्रिल रोजी रिसोड शहरातील बसस्थानक समोर डॉ. साबू यांच्या हॉस्पीटल जवळ विविध मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या थाटामाटात व उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा.अनंतराव देशमुख हे होते यावेळी आमदार तान्हाजी मुटकुळे, आमदार शाम खोडे,, माजी आमदार विजयराव जाधव, माजी आमदार संजय रायमुलकर, नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर, वाशीम नगर पालिकेचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, , तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, परमपूज्य शांतिपुरी महाराज ह भ प बालयोगी गोपालनाथ महाराज परमपूज्य सुरेश जी महाराज उटी किसन स्वामी महाराज साधना केंद्र करंजखेड, माजी जि.प उपाध्यक्ष चक्रधर

**विविध क्षेत्रातील**

गोटे, राकॉ जिल्हाध्यक्ष बाबाराव खडसे माजी सभापती बाळासाहेब खरात अनंत नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष तानाजीराव रंजवे, उपाध्यक्ष डी के देशमुख माजी जिल्हा परिषद सदस्य भैय्यासाहेब देशमुख, इंजि.बाळासाहेब देशमुख, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टरअशोकराव इंगोले शिवसेना जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे, माजी सभापती वैभव सरनाईक, दि.अकोला मध्यवर्ती जिल्हा बँकेचे, माजी उपाध्यक्ष वामनराव देशमुख, , ठाणेदार रामेश्वर चव्हाण, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष माधवराव अंभोरे, रिसोड शहरातील नगरसेवक यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती . सुरुवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व गणपतीची पूजा करून उद्घाटन करण्यात आले यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचा डॉक्टर अमोल नरवाडे सौ करुणा नरवाडे रतन नरवाडे डॉक्टर मदन नरवाडे तसेच नरवाडे परिवारातर्फे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉक्टर अमोल नरवाडे यांनी केले.

याप्रसंगी बालयोगी गोपालनाथ महाराज बाळासाहेब खरात, माधवराव अंभोरे बाबाराव देशमुख, बाबाराव खडसे ,महादेवराव ठाकरे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हॉस्पिटलच्या स्थलांतरण व उद्घाटनास शुभेच्छा दिल्या. तसेच गेल्या दहा वर्षापासून नरवाडे दाम्पत्य रिसोड शहरात आपली सेवा देत आहेत आणि आज ते एवढ्या मोठ्या स्वतः च्या इमारतीत स्थलांतरीत होत आहेत ही त्यांच्या आई वडिलांची पुण्याई व निस्वार्थ सेवाभाव याच्या जोरावर आज त्यांनी ही प्रगती केली असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. एखादे झाड जर वटवृक्षात रूपांतर होते तर त्याची मुळे ही मजबूत व खोल असावी लागतात त्याचप्रमाणे आज अमोल नरवाडे व सौ करूणा नरवाडे यांचे आई-वडिलांनी त्यांच्यावर जे संस्कार केले त्यामुळे आज ते एवढे मोठे यश संपादन करू शकले असे प्रतिपादन मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.जितेंद्र गवळी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.करुणा नरवाडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉक्टर असोसिएशनचे सर्व डॉक्टर मंडळींनी अथक परिश्रम घेतले दिवसभर डॉ.अमोल नरवाडे व सौ करुणा नरवाडे यांना शुभेच्छा देण्यासाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय व्यवसायातील अनेक मान्यवर व आमंत्रित उशिरापर्यंत सुरु होते.

# सरपंच पदाचा गैरवापर, शासकीय निधीत अफरातफर!

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील वरूड तोफा व कोयाळी खुर्द गट ग्राम पंचायतचे सरपंच यांनी ग्राम पंचायत सचिव यांच्याशी संगनमत करून शासकीय निधीत अफरातफर करत मोठा आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचा आरोप करण्यात आला असून या धक्कादायक प्रकरणामुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. या बाबत तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र चौकशी अहवालास जाणीवपूर्वक विलंब होत असल्याने सदर गैरप्रकरणात वरिष्ठांचे देखील हात ओले झाले असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. परिणामी प्रशासनाने तात्काळ चौकशी करून सत्य बाहेर काढावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तालुक्यातील वरुड तोफा परिसरातील गट ग्रामपंचायत कोयाळी खुर्द येथे गंभीर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप पुढे आला असून, या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायतीचे सचिव व सरपंच यांनी संगनमत करून सरपंच पती, मुलगा पुतणे तसेच गावात वास्तव्यास नसलेल्या व्यक्तींच्या



नावावरून शासकीय निधी काढल्याचा आरोप करण्यात आला आहे. व घरच्याच नातेवाईक काला घरकुल योजनेचा लाभ दिल्याचा आरोपही सिद्ध आहे विशेष म्हणजे, चौकशीदरम्यान संबंधित ग्रामपंचायतीमध्ये आवश्यक नोंदी (रेकॉर्ड) उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बनावट कागदपत्रांच्या आधारे गैरव्यवहार झाकण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा सुरू आहे.यामध्ये गटविकास अधिकारी गजानन खुळे व विस्तार अधिकारी विजय साबळे यांचा सहभाग असल्याचा संशयही व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक विलंब केला जात असून दोषींना वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.या संपूर्ण प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे. प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून सत्य बाहेर आणावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# कृषी केंद्र संचालकांचा खामगावात कडकडीत बंद !

### ♦ प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले!

प्रतिनिधी २८ एप्रिल

**खामगाव :** कृषी केंद्र चालक व विक्रेते सोमवारी कडकडीत बंद संघटनांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शहरात पाळण्यात आला. जिल्ह्यातील विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बुलढाणा जिल्हाभर बेमुदत आंदोलनाची हाक देण्यात आली असून, त्याचा प्रभाव खामगावात स्पष्टपणे दिसून आला.

सोमवारी सकाळपासून शहरातील बहुतांश सर्वच कृषी सेवा केंद्रे पूर्णपणे बंद ठेवण्यात आली. त्यामुळे खत, बियाणे व कीटकनाशक खरेदीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागला. अनेक ठिकाणी शेतकरी परत फिरताना



दिसून आले. संघटनांच्या माहितीनुसार, रासायनिक खतांवरील डीलर मार्जिन वाढविणे, खत पुरवठाविना लिंकिंग' सुलभ करणे, अनधिकृत एचटीबीटी बियाण्यांच्या विक्रीवर बंदी घालून संबंधितांवर फौजदारी कारवाई करणे, या प्रमुख मागण्या आहेत. तसेच 'साथी' ॲपद्वारे बियाणे व कीटकनाशक विक्रीची सक्ती व्यवहार्य नसल्याचा आरोप करत, ती रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, निविष्ठा नियमांनुसार सीलबंद कृषी विक्रीनंतरही कृषी केंद्रांवर दाखल होणाऱ्या गुन्ह्यांना विरोध दर्शविण्यात आला आहे. नवीन सीड ॲक्ट व कीटकनाशक कायद्यातील जाचक तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचीही आंदोलनकर्त्यांनी केली आहे. मागणी संघटनांच्या वतीने इशारा देण्यात आला आहे की, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर आंदोलन आणखी तीव्र केले जाईल. दरम्यान, बुलढाणा जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही या बंदला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले

# दिव्यांग सहायक पोर्टल ची तारीख वाढविण्यात यावी



### ♦ विराट मल्टिपर्पज फाउंडेशन ची मागणी

प्रतिनिधी २८ एप्रिल

**खामगाव :** दिव्यांगांसाठी दिव्यांग सहायक पोर्टल ची तारीख वाढविण्याबाबत आज राज्याचे मुख्यमंत्री यांना सोनाली भाजीभाकरे तहसीलदार खामगाव यांच्या वतीने विराट मल्टीपर्पज फाउंडेशन जिल्हाध्यक्षा कविताताई इंगळे यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाकडून दिव्यांगांसाठी दिव्यांग सहायक पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे. सर्व दिव्यांग बंधू-भगिनींनी आपली नोंदणी या पोर्टलवर करणे अनिवार्य आहे. नोंदणी न केल्यास आपल्याला शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागू शकते.असे सूचित केले आहे नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे १. आधार कार्ड २. ळअ्रुङ कार्ड (दिव्यांग प्रमाणपत्र) ३. १० वी / १२ वी मार्कलिस्ट ४. जातीचा दाखला (ण्रैू ण्रीर्ग्मेि) ५. रहिवासी दाखला (अ्दस्म्मत ण्रीर्ग्मेि) ६. मतदान कार्ड ७. पॅन कार्ड ८. बँक पासबुक ९. विवाह नोंदणी दाखला (असल्यास) १०. जन्माचा दाखला अशी कागदपत्रे मागितलेली आहे ती सर्व तयार करण्यास वेळ लागेल तसेच शाळा कॉलेज तसेच उन्हाची तीव्रता पाहता सोबतच लग्न विधी चे दिवस सुट्टी असल्याने दिलेली ३० एप्रिल ची मुदत कमी आहे त्या मुळे ती तारीख वाढवीत जुलै महिन्या पर्यंत ची मुदत करण्यात यावी अश्या मागणीचे निवेदन आज देण्यात आले यावेळी जिल्हाध्यक्षा कविताताई सुखदेव इंगळे, सरलाताई देशमुख, पल्लवी ताई पाटील, सविता ताई चव्हाण, शत्रुघ्न महाले, ऋतुराज गवई संजय कोलस्कर, अविनाश गवली गजानन वानखेडे, आदी यावेळी उपस्थित होते

# गॅस सिलिंडरचा स्फोट ; जखमी वृद्धाचा मृत्यू

### ♦ १० दिवसांची झुंज अपयशी: वाडी परिसरातील घटना

प्रतिनिधी २८ एप्रिल

**खामगाव :** खामगाव जलंब रोडवरील वाडी परिसरात १७ एप्रिल रोजी तीन गॅस सिलिंडरचा स्फोट झाला होता. यामध्ये जखमी वृद्धाचा उपचारादरम्यान अकोल्यात मृत्यू झाला. दहा दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर अखेर सोमवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १७एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास एका हॉटेलमध्ये सलग तीन गॅस सिलिंडर स्फोट होऊन मोठी दुर्घटना घडली होती. या स्फोटात अरुण अनोकार (वय ७२), व्यवसायाने शिवणकाम करणारे कारागीर, हे हॉटेलमधील कपडे आणण्यासाठी गेले असताना गंभीररीत्या भाजले होते. घटनेनंतर त्यांना तातडीने प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले होते. गत दहा दिवसांपासून त्यांच्यावर अकोल्यात उपचार सुरू होते; मात्र प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने सोमवारी पहाटे त्यांचा मृत्यू झाला. शवविच्छेदनानंतर सोमवारी दुपारी वाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.दरम्यान, स्फोटाच्या भीतीने शेजारच्या इमारतीवरून उडी घेतलेल्या १९ वर्षीय युवतीवर उपचार सुरू असून, तिची प्रकृती सध्या धोक्याबाहेर असल्याची माहिती आहे. या घटनेनंतर हॉटेलमधील सुरक्षा उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. शहर पोलिसांनी याप्रकरणी नव्याने गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू करावी, संबंधित हॉटेल मालकाविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# पहिल्या टप्प्यात दमदार कामगिरी, दुसऱ्या टप्प्यात जिल्हा पिछाडीवर!

### ♦ शहरी आवास योजनाः घरकुलांचे स्वप्न अर्धवट ? इशारा

प्रतिनिधी २८ एप्रिल

**बुलढाणा :** 'प्रत्येकाला घर' या घोषणेने सुरु झालेल्या प्रधानमंत्री शहरी आवास योजनेत बुलढाणा जिल्ह्याने पहिल्या टप्प्यात चांगली कामगिरी केली असली तरी दुसऱ्या टप्प्यात मात्र गती मंदावल्याचे वास्तव आकडे सांगत आहेत. उपलब्ध अधिकृत आकडेवारीनुसार २०१६-१७ ते २०२५-२६ या कालावधीत पहिल्या टप्प्यात ४,७४७ घरकुलांना मंजुरी मिळाली आणि त्यापैकी तब्बल ४,३५५ घरकुले पूर्ण झाली. म्हणजेच ९१.७४ टक्के काम पूर्ण केले आहे. विशेष म्हणजे ही कामगिरी राज्याच्या सरासरीला स्पर्श करणारी मानली जाते; मात्र याच योजनेच्या पुढील टप्प्यात चित्र उलट दिसते. २०२५-२६ साठी १,१९० घरकुलांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून सर्व प्रस्तावांना मंजुरी मिळाली असली, तरी प्रत्यक्षात फक्त २७५ घरकुले पूर्ण झाली आहेत. पूर्णतेचे प्रमाण केवळ २३.१० टक्क्यांवर घसरले असून तब्बल ९१५ घरकुले अजून कागदोपत्रीच अडकली आहेत. यामुळे 'मंजुरी ते वास्तव' हा प्रवासच अडखळल्याचे चित्र आहे. पहिल्या टप्प्यातील गती आणि दुसऱ्या टप्प्यातील मंदी यातील विरोधाभास उभे करतो. निधी उपलब्ध असतानाही अंमलबजावणीचा वेग का कमी पडतोय, लाभार्थ्यांना प्रत्यक्ष घर मिळण्यात अडथळे कुठे आहेत, या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची गरज निर्माण झाली आहे.प्रधानमंत्री शहरी आवास योजना ही शहरी गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्वतःचे घर मिळवून देण्यासाठी महत्त्वाची योजना मानली जाते. केंद्राकडून आर्थिक सहाय्य, राज्याचा वाटा आणि लाभार्थ्यांचा सहभाग अशा त्रिसूत्रीवर ही योजना उभी आहे. पहिल्या टप्प्यातील यश हे लाभार्थ्यांच्या अपेक्षांना बळ देणारे ठरले; पण नव्या टप्प्यातील संथ गती हीच अपेक्षा डळमळीत करत आहे. एकूणच, बुलढाण्यात 'घरकुलांची झेप' पहिल्या टप्प्यात दमदार होती; पण दुसऱ्या टप्प्यातील घसरलेली गती हीच प्रशासनासमोरील मोठी कसोटी ठरत आहे. मंजुरीचे आकडे मोठे असले तरी त्या घरांचे दरवाजे प्रत्यक्ष लाभार्थ्यांसाठी कधी उघडणार, हा खरा प्रश्न आता उभा ठाकला आहे.

# रेल्वे मालधक्क्यावरील मजुरीच्या प्रश्नावर तोडगा नाही ; ट्रकचालकांची निदर्शने !

### ♦ मजुरीच्या मागणीवरून वाद तीव्र; आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी २८ एप्रिल

**खामगाव :** रेल्वे मालधक्क्यावर हमाल व मालवाहतूक करणाऱ्या ट्रकचालकांच्या मजुरीच्या प्रश्नावर अद्याप कोणताही ठोस तोडगा निघालेला नसल्याने तणाव निर्माण झाला आहे. नवीन कंत्राटदार जुन्या दरानेच काम करण्यास भाग पाडत असल्याचा आरोप करत ट्रकचालकांनी सोमवारी (दि. २७) रेल्वे मालधक्क्यावर निदर्शने केली असून, पुढील आंदोलनाचा इशाराही दिला आहे. रेल्वे स्टेशन परिसरातील मालधक्क्यावर माल उचलण्याचे काम करणारे हमाल तसेच वाहतूक करणारे ट्रकचालक यांना कंत्राटदाराकडून कमी दरात काम करण्यास सांगितले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रश्नावर ट्रकचालकांनी कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले होते; मात्र त्यानंतरही संबंधित कंत्राटदार मजुरीचे दर वाढवून देण्यास तयार नसल्याचा आरोप ट्रकचालकांकडून करण्यात येत आहे.

खामगाव मालधक्क्यावर निदर्शने करण्यात आली.रेल्वे मालधक्क्यावर हमाल व ट्रकचालकांच्या मजुरीच्या प्रश्नावर अद्याप कोणताही तोडगा न निघाल्याने ट्रकचालकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मागणीसाठी त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला असून, रेल्वे मालधक्क्यावर साखळी उपोषण करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या संदर्भात २७ एप्रिल रोजी खामगाव रेल्वे स्टेशन मास्टरला निवेदन देण्यात आले.

# खामगाव 'कृउबास' मध्ये सोयाबीनची चोरी

### ♦ व्यापारी त्रस्त : सोमवारी नोंदविला निषेध

प्रतिनिधी २८ एप्रिल

**खामगाव :** येथील कृषी उत्पन्न बाजार समिती (कृउबास) यार्डात घडलेल्या सोयाबीन चोरीच्या प्रकाराने व्यापाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, सोमवारी अडते, व्यापाऱ्यांनी थेट सभापती व सचिवांच्या कार्यालयात धडक देत तीव्र निषेध नोंदविला. या घटनेच्या निषेधार्थ काही काळ बाजार समितीचे कामकाजही ठप्प झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, अ वर्ग व्यापारी सुयोग प्रमोद झंवर यांनी २४ एप्रिल रोजी अडतदारांकडून मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी केला होता; मात्र वाहतूक व्यवस्था उपलब्ध न झाल्याने अंदाजे ३० हजार रुपयांचा शेतमाल यार्डातील दुकानातच ठेवला होता.

दुसऱ्या दिवशी, म्हणजेच २५ एप्रिल रोजी माल उचलताना वजन काटा केल्यावर सुमारे ५ क्विंटल सोयाबीन कमी आढळले. या प्रकारामुळे व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. तत्काळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता, तोंड झाकून आलेली एक अज्ञात महिला माल चोरी करत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. या घटनेमुळे बाजार समितीतील सुरक्षा यंत्रणेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संतप्त व्यापाऱ्यांनी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त करत सभापती व सचिवांची भेट घेतली. सीसीटीव्हीच्या आधारे तातडीने आरोपीला अटक करून चोरीचा माल परत मिळवावा, अन्यथा आंदोलन तीव्र करू, असा इशारा यावेळी देण्यात आला. दरम्यान, या प्रकारामुळे कृउबास यार्डातील सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला असून, व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वारंवार अशा घटना घडत असल्यास व्यापारावर विपरीत परिणाम होईल, अशी चिंता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने त्वरित ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा मोठ्या आंदोलनाला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा व्यापाऱ्यांनी दिला आहे.

# महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

प्रतिनिधी २८ एप्रिल

**खामगाव :** तालुक्यातील एका गावातील २९ वर्षीय महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात रविवारी उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, आरोपी हा मागील काही दिवसांपासून फिर्यादीच्या घरासमोर येऊन वारंवार चकरा मारत होता, तसेच तो तिच्याकडे वाईट नजरेने पाहात असून, जबरदस्तीने संपर्क एप्रिल रोजी सकाळी वाजण्याच्या राहून पाहत होता.

साधण्याचा प्रयत्न करीत होता. २० फिर्यादीच्या घराच्या दरवाजासमोर उभा सुमारास १०:३० आरोपी याबाबत विचारणा केल्यावर त्याने पुन्हा वाईट हेतूने वर्तन करत भेटण्याचा प्रयत्न केला.

या प्रकारामुळे पीडितीने पोलिस स्टेशनमध्ये धाव घेत तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून पोलिस हवालदार असून, पुढील तपास कैलास सातव यांनी गुन्हा दाखल केला हवालदार बाळकृष्ण फुंडकर करीत पोलिस आहेत.

# गोविंद पानसरे लिखीत शिवाजी कोण होता पुस्तकाचे वाचन

'शिवाजी कोण होता?' पुस्तकाचे वाचन करताना 'वंचित'चे पदाधिकारी.
गायकवाड यांनी प्रकाशकास दिलेल्या धमकीचा निषेध

प्रतिनिधी २८ एप्रिल

**जळगाव जामोद :** स्थानिक तहसील चौकात सोमवारी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने कॉ. गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. हा उपक्रम जिल्हाध्यक्ष देवा हिवराळे यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका अध्यक्ष देवानंद दामोदर यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज हे स्वराज्य रक्षक त बहुजन प्रतिपालक असल्याचा इतिहास समाजापर्यंत पोहोचवण्यावर भर देण्यात आला. बुलढाणा मतदारसंघाचे आ. संजय गायकवाड यांनी पुस्तकाच्या प्रकाशकास केलेल्या शिवीगाळ व जिवे मारण्याच्या धमकीचा निषेध नोंदविण्यात आला. राज्यभर या पुस्तकाचे वाचन करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमानंतर 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी तालुका महासचिव सुनील बोदडे, माजी तालुकाध्यक्ष रतन नाईक, सम्यक विद्यार्थी आंदोलनचे जिल्हाध्यक्ष मोहित दामोदर, प्रमोद कोकाटे, साहेबराव जाधव, सुदाम गवई, श्रीराम भिडे, अक्षय वाकोडे, ज्ञानेश्वर तायडे, भीमराव हेलोडे, विजय पारवे, यशवंत भगत, रामभाऊ तायडे, संतोष तिजारे, सतीश तायडे, गोपाल सोनोने, रोशन मदनकार, रमेश तायडे, राहुल वाघ, तुकाराम गटमने, सुरेश वाघोदे, भास्कर जुमळे, पिंटू पारवे, सुरेश शिरसाट, नारायण पारवे, राहुल वानखडे, आकाश कराळे आदी उपस्थित होते.

# गोवंशाला 'राष्ट्रमाता' दर्जा देण्यासाठी खामगावात हजारो गोभक्तांचा एल्गार ; 21,600 स्वाक्षऱ्याचे निवेदन सादर

प्रतिनिधी २८ एप्रिल

**खामगाव :** भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ४८ आणि ५१(ु) च्या मूलतत्त्वांचे पालन करून 'अखिल भारतीय वेदलक्षणा गोवंशाला' 'राष्ट्रमाता' किंवा 'राष्ट्र आराध्या' हा संवैधानिक दर्जा मिळावा, या मागणीसाठी आज खामगाव येथे अभूतपूर्व 'गो सम्मान आह्वान अभियान' पार पडले. या आंदोलनाद्वारे केंद्र सरकारने तात्काळ 'केंद्रीय गोसेवा मंत्रालय' स्थापन करावे आणि संपूर्ण भारतासाठी एकसमान 'गोवंश संरक्षण कायदा' लागू करावा, अशी आर्त हाक प्रशासनामार्फत राष्ट्रपतींना घालण्यात आली आहे.








आंदोलनाचे स्वरूप आणि लोकसहभाग

खामगाव तालुक्यातील तहसील/एस.डी.ओ. कार्यालयावर काढण्यात आलेल्या या आंदोलनात परिसरातील ५०० ते ७०० सक्रिय गोरक्षक, हिंदुत्ववादी कार्यकर्ते आणि गोसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, या मोर्चाची शोभा वाढवण्यासाठी प्रत्यक्ष गोमाताही उपस्थित होत्या. 'गोहत्या बंद करा', 'गोवंश वाचवा-देश वाचवा' अशा घोषणांनी खामगाव शहर दणाणून गेले होते. या मोहिमेला जनसामान्यांचा मोठा पाठिंबा मिळाला असून, तालुक्यातील २१,६०० नागरिकांच्या स्वाक्षऱ्या असलेले पत्र निवेदनासोबत जोडण्यात आले आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्या आणि संवैधानिक आधार:

अभियानाचे समन्वयक आणि कार्यकर्त्यांनी तहसीलदारांमार्फत महामहिम राष्ट्रपतींना सादर केलेल्या निवेदनात खालील महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले आहेत:

संवैधानिक दर्जा: गोवंश हा भारतीय संस्कृती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असल्याने त्याला 'राष्ट्रमाता' म्हणून घोषित करावे.

एकीकृत केंद्रीय कायदा: सध्या विविध राज्यांमध्ये गोवंश संरक्षणाचे कायदे भिन्न आणि विसंगत आहेत. त्यामुळे अनुच्छेद २५ (धार्मिक स्वातंत्र्य) आणि अनुच्छेद २१ (गरिमापूर्ण जीवन) अंतर्गत संपूर्ण देशासाठी एकच कठोर 'केंद्रीय गोसेवा व संरक्षण अधिनियम' तयार करावा.

मंत्रालयाची स्थापना: गोवंशाच्या संवर्धन आणि व्यवस्थापनासाठी स्वतंत्र 'केंद्रीय गोसेवा मंत्रालय' स्थापन करावे.

तस्करी आणि वधावर बंदी: गोवंशाची तस्करी आणि वध हा 'संज्ञेय व बिगर-जामीनपात्र' गुन्हा ठरवून दोषींना आजन्म कारावासाची तरतूद करावी.

महामार्ग सुरक्षा: राष्ट्रीय महामार्गांवर दर ५० ते १०० किमीवर 'गो-वाहिनी रुग्णवाहिका' आणि जखमी गोवंशासाठी आधुनिक ट्रॉमा सेंटर्स उभारण्यात यावेत. गोचर भूमी संरक्षण: सर्व गोचर, ओरण आणि वन जमिनींवरील अतिक्रमणे दूर करून त्या जमिनी गोचर विकासासाठी आरक्षित कराव्यात.

शिक्षण आणि आरोग्य: शालेय अभ्यासक्रमात 'गो-विज्ञान' हा अनिवार्य विषय समाविष्ट करावा आणि मानवी आरोग्यासाठी पंचगव्य औषधांना प्रोत्साहन द्यावे.

पुढील आंदोलनाची दिशा:

हे आंदोलन पूर्णतः अहिंसक आणि सात्विक मार्गाने चालवले जात आहे. निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की:

मे ते जुलै २०२६: शासनाच्या सकारात्मक निर्णयाची प्रतीक्षा केली जाईल.

२७ जुलै २०२६: जर निर्णय झाला नाही, तर जिल्हा मुख्यालय स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून पुन्हा स्मृती निवेदन दिले जाईल.

फेब्रुवारी २०२७: तरीही मागणी मान्य न झाल्यास, देशाची राजधानी नवी दिल्ली येथे लाखो गोभक्तांच्या उपस्थितीत विशाल संकीर्तन आणि प्रार्थना सभा आयोजित केली जाईल.

'ही केवळ एका संघटनेची मागणी नसून, कोट्यवधी सनातनी भारतीयांच्या श्रद्धेचा विषय आहे. गोवंश हा भारताचा 'जीवनधन' असून त्याचे रक्षण करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे,' असे आवाहन याप्रसंगी 'गो सम्मान आह्वान अभियान' समितीच्या वतीने करण्यात आले.


विदर्भ स्तरीय मिटिंग
विदर्भ कंत्राटदार संघटनेतील
संपूर्ण विदर्भातील ११ जिल्ह्यांमधून
येणाऱ्या पदाधिकारी व सर्व सदस्यांचे
वाशिम नगरीमध्ये
हार्दिक स्वागत !
भारतरत्न
सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या
स्वागतोत्सुक
राजुभाऊ अग्रवाल (अध्यक्ष)
मुकेश ठाकुर (उपाध्यक्ष)
स्वप्नील सरनाईक (सचिव)
सुधीर जाधव
सुभाषराव सरनाईक
सुरेशभाऊ दहात्रे
दादुजी पांडे
संजय डिवरे
श्यामजी जाधव
सुरेश मुंढे
स्वप्नील देशमुख
विनोद लद्धा
निकुंज देवानी
आत्माराम चव्हाण
गिरीष ढोले
सतिष हिंगणकर
बाळु व्यवहारे
सुमित पाटील
अतुल तुपसांडे
एकनाथ शिंदे
किरण क्षार
ऋषभ सरनाईक
संजय भुरभुरे
गणेश वर्मा
वरुण भालेराव
पांडूरंग नागरे
आशिष देशमुख
वाशिम जिल्हा कंत्राटदार संघटना वाशिम जिल्हा